
# श्री साईलीला



दहिहंडीचा खेळ

सप्टेंबर ६० पैसे १९७७

# अनुक्रमणिका - सप्टेंबर १९७७


| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | श्रीगजानन |
| २ | गाठीभेटी-श्रीभालचंद्र महाराज | — | श्री. सुरेश सातपुते |
| ३ | श्रीसाईबाबा मंदिर, कर्नाळा | — | श्री. राजाराम हुमणे |
| ४ | साताराचे सत्पुरुष श्रीअड्ळकरबाबा | — | श्री. अमृतभाऊ सरगडे |
| ५ | श्रीमाधवनाथ महाराज | — | श्री. श्री. ना. हुद्दार |
| ६ | श्रीसाईबाबांचा अनुभव | — | सौ. अनिता दुबेद्वार |
| ७ | प्रदक्षणा | — | श्री. शंकर इनामदार |
| ८ | बाबांच्या उदीचा चमत्कार | — | श्री. अरुण निमल |
| ९ | बाबांचे नामस्मरण केले नि... | — | श्री. रमेश किनारे |
| १० | वाऱ्यावरचे विचार | — | श्री. द शं. टिपणीस |
| ११ | वाचकांचा पत्रव्यवहार | — | श्री. सूर्यकांत धारगळकर |
| १२ | श्रीसाईबाबा मंदिर, पिळगावचा गुरु पोर्णिमा उत्सव | | |
| १३ | शिर्डी वृत्त | — | |
| १४ | साईनाथ स्मरा | — | श्री. स. मा. मुऱ्हार |
| १५ | श्रीसाई | — | कु. सुधा शिवलकर |
| १६ | श्रीसाई दर्शन | — | श्री. सुभाषचंद्र वैष्णव |
| १७ | संतश्रेष्ठ | — | श्री. मधुकर वखारे |
| १८ | शिरडीच्या साईनाथा | — | सौ. गंगूबाई बोरकर |
| १९ | गुरुमाऊली | — | सौ. आशा दांडेकर |
| २० | साईमहिमा | — | सौ. शालिनी औसेकर |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्रीसाई वाक्सुधा

धांव पाव गा गुरुवरा ।
भक्तजन करुणा करा ।
उसंत नाहीं या संसारा ।
येरझारा पुरे आतां ॥११०॥

आम्हां स्वभाव प्रवृत्तिपरां ।
बाह्यविषया लोचन तत्परां ।
विषय भोगां पासाव आवरा ।
वृत्तीसी करा अंतर्मुख ॥१११॥

लाटेसरसे सैरा वाहत ।
चालल्लो आम्ही भवसागरांत ।
देऊनियां प्रसंगीं हात ।
भवनिर्मुक्त करा कीं ॥११२॥

इंद्रियें वाहती सैरा वैरा ।
प्रवृत्त होती दुराचारा ।
बांधा उच्छृंखल नदीस बंधारा ।
फिरवा माघारा इंद्रियगण ॥११३॥

इंद्रियें न जो अंतर्मुख ।
आत्मा न कदा होई सन्मुख ।
त्यावीण कैंचे आत्यंतिक सुख ।
जन्म निरर्थक होईल ॥११४॥

— श्रीसाईसच्चरित - अध्याय २५ वा.

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५६ वे ] सप्टेंबर ७७ [ अंक ६

: संपादक :

श्री. का. सी. पाठक,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४-बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## संपादकीय—

स. न. वि. वि.

# त्रिखंडात पूजिले जाणारे दैवत—श्रीगणपति



● यंदाचा अधिक श्रावणमास संपला आणि निज श्रावणमास सुरू झाला आणि आम्हा हिंदु धर्मियांचे सणासुदीचे दिवस पुन्हा धुमधडाक्याने सुरू झाले. या सर्व सणात महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध भारतभर सर्वत्र उत्साहाने आणि मोठ्या जल्लोषाने चांगला दहा दिवस साजरा होणारा जो सण आहे तो म्हणजे गौरी-गणपती. भाद्रपद शु. चतुर्थीपासून चतुर्दशीपर्यंत हा सण उत्सव हिंदुधर्मियांच्या घरोघरी साजरा केला जातो. या काळात घरोघरी गोडधोड जिन्नस नैवेद्य म्हणून का होईनात केले जातात व आप्त नातलग इष्टमित्र मंडळी देवदर्शनाच्या निमित्ताने सारखी येजा करीत असतात आणि वातावरण मोठे प्रसन्न होऊन जाते.

गणेश देवता पुराणांतरीची विभूती आहे; व ती विघ्नविनाशक आहे अशी अनादीकालापासूनची समजूत असून सर्व वर्गाच्या लोकांचे ते आराध्यदैवत आहे. गजाननाची पूजा अर्चा भारतातील बहुतेक साऱ्याच धर्माचे व मताचे लोक करतात. शैव व वैष्णव यांच्या धार्मिक भावना परस्परविरोधी असूनसुद्धा या दोन्ही पंथाचे लोक या विघ्नहर्त्याची पूजा-प्रार्थना मनोभावे करतात. भगवान गणेश शिवाचा पुत्र असल्याने शैव त्याची पूजा विशेष भक्तीभावाने करतात आणि गणपती हा विष्णूचा अवतार आहे असे वैष्णव मानतात व ते त्याला भजतात. यामुळे भारतातील प्रत्येक गावामध्ये निदान एकतरी गणपतीचे देऊळ असतेच असते.

कोकणात किंवा देशावर शेतकरी लोकसुद्धा नांगरणी करण्यापूर्वी गणपतीला आवाहन करतात म्हणजेच बैलाला ‘ गण्या ’ अशा नावाने संबोधतात; व मगच ते नांगराला जुंपतात. गणेश विघ्नहर्ता असल्याने आपल्या घरात विघ्नांचा लवलेश-

मुद्दा नसावा जर कदाचित् विघ्न आलेच तर त्याचे निवारण करण्यासाठी म्हणून दरवाजावर श्रीची मूर्ती कोरलेली आढळते. ही गणेशमूर्ती दरवाजाच्या ज्या पट्टीवर कोरलेली आढळते तिला गणेश पट्टी असे म्हणतात.

आपल्या भारतात दक्षिणेकडे तर या मोरयाला खूपच मोठा मान दिला जातो. तिथे गजाननाला 'बलम्बुरी विनायक' किंवा 'इदम्बुरी विनायक' या नावाने संबोधतात. तामीळ देशात या लंबोदराला 'तुम्बिकाई अलवर' म्हणजे 'बुद्धिमान गजानन' म्हणतात. हत्ती या प्राण्याशी गणेशाचे बरेचसे साम्य आहे. गजाननाला गजकर्ण, हत्तीमुख, वक्रतुण्ड अशी जी नावे आहेत ती हत्तीच्या रूप-सादृश्यावरूनच मिळालेली आहेत. यामुळेच की काय उत्तर व दक्षिण भारतातील वृद्धजन रस्त्यातून जाता येताना हत्ती दिसला रे दिसला की त्यास मोठ्या आदराने लवून नमस्कार करतात. हत्ती म्हणजे जणू काही गणपतीच पुढे आला आहे अशी त्यांची समजूत आहे. तेलगू प्रांतात गणपतीला 'आलयट्टू पिल्लेयार' किंवा 'लयन्तु पिल्लेयार' असे म्हणतात. तिथे कोणत्याही पूजेच्या आरंभी गणेशाला मान दिला जातो व सर्वात प्रथम त्याचीच पूजा केली जाते.

जगातील सर्वांत विलक्षण समजली जाणारी गणेशमूर्ती भारतात आहे. ती मूर्ती म्हणजे हिमालयातील 'मुंडकटा गणेश' ही होय. नावाप्रमाणेच या मूर्तीला मस्तक नाही. या मूर्तीची पूजा नेहमीच होत असते. पण त्यावेळी मूर्तीच्या छातीला गंध लावतात. पार्वतीने आपल्या अंगाच्या मळापासून बनविलेल्या पुत्राचा श्रीशंकराने शिरच्छेद केला त्या कथेतीलच ही मूर्ती होय अशी तिकडील श्रद्धा आहे.

दिल्लीजवळील हरियाना राज्य व भिवानीनगर येथे तर गणेश पूजनाचा सोहळा चांगला पंधरा दिवस चालतो. भाद्रपद सुरू होताच तेथल्या शाळांना गणपतीची मुद्दाम सुट्टी देण्यात येते. ज्या ज्या विद्यार्थ्यांच्या घरी गणपती पूजनाचा कार्यक्रम असतो त्या त्या घरी शिक्षक आपल्या शिष्यमंडळीसह भेट देतात. गुरुजींचे मोठ्या आदराने घरोघरी स्वागत केले जाते. नंतर मास्तर व घरातली शाळेत जाणारी मुले यांना तिलक लावण्यात येतो. लाडू वाटले जातात आणि गुरुजनांना यथाशक्ती भेट देऊन मोठ्या प्रसन्नतेने निरोप दिला जातो. गुरुजी म्हणजे साक्षात् गणेश व त्यांच्या बरोबरची मुले म्हणजे त्यांचे गण शिष्य तेव्हा बुद्धीची देवता गणेश हिच्या जन्मोत्सवी मुले आणि मास्तर यांना जर प्रसन्न केले तर आपल्या मुलाचे अमंगल होणार नाही असा तेथील लोकांचा विश्वास आहे.

नेपाळमध्ये गणेशास 'सूर्य विनायक' किंवा 'लोंडी गणेश' या नावाने संबोधतात. बौद्ध आणि जैन उभय पक्षाचे लोक तिथे गणेशपूजा करतात. नृत्य

गणपती हा नेपाळातील गणपतींचा विशेष होय. या मूर्तीची अंगकांती तांबूस असून त्याचे पाय हिरव्या रंगाच्या उंदरावर असलेले दिसतात. या उंदराचे तोंडात चिंतामणि नामक रत्न असते. या गणपतीचा डावा पाय सरळ असून उजवा पाय गुडघ्यात वाकवून आडवा केलेला असतो. मुकुटात चिंतामणि रत्न असून त्या रत्नांचीच माळ गळयात पण असते. हातात आयुधे सुद्धा असतात.

नेपाळात 'हेरंबगणपती' या नावाचाही एक देव आहे. नवल असे की या देवाला दहा हात व पाच मस्तके असून त्यापैकी तीन तोंडे खाली व दुसरी दोन मधल्या मस्तकावर एकावर एक तीन मजली वाड्याप्रमाणे आहेत. त्याचे वाहन सिंह आहे.

दक्षिण भारतात नेगापट्टम या ठिकाणी गणेशाची धातूची अजब मूर्ती असून तिची चर्चा मुद्‌गल पुराणात केलेली आढळते. या नवलपूर्ण मूर्तीला हत्तीच्या मुंडक्यासारखी पाच मुंडकी असून ती सगळी एकसारखी आहेत. ही गणेशमूर्ती सिंहासनावर आरूढ आहे. ही मूर्ती 'हेरंब गणपती' या नावाने तिकडे खू प्रसिद्ध आहे.

उत्तर भारतात काशी क्षेत्री श्रीविश्वेश्वराच्या सभोवतालचे आठ ओवऱ्यात छप्पन विनायक असून ते केवळ स्मरणानेच सिद्धी देतात अशी त्यांची ख्याती आहे. भूमरा येथल्या प्रसिद्ध गणेश मंदिरातील मूर्ती नवसास हटकून पावते अशी आख्यायिका आहे.

श्रीक्षेत्र गोकर्ण येथे द्विभूज गणेशाची विचित्र मूर्ती असून रावणाने गणपतीच्या डोक्यावर प्रहार केल्याची खूण या गणपतीच्या मस्तकावर दाखविण्यात येते. वाईला असलेल्या प्रख्यात ढोल्या गणपतीची तर शिडी लावून पूजा केली जाते.

हे गणेश पुराण झाले भारतातील. आता परदेशात तर या देवासंबंधीचा आदर तरी पहा – बाली द्विपावर लांब पल्ल्याला जाणाऱ्या मोटारी व बसेसवर व त्यांच्या स्थानकावर गणेशाच्या प्रतिमा लावलेल्या असतात. प्रवाशांचा प्रवास निर्विघ्नपणे पार पडो असाच अर्थ या प्रतिमांद्वारा प्रतीत होतो.

सुमात्रामध्ये मृत राजाच्या किंवा राणीच्या तसबिरीच्या आसपास गणपतीची प्रतिमा अवश्य ठेवण्यात येते. आपल्या मृत राजाच्या आत्म्याचे संरक्षण ही देवता करीत असते असा तिथे समज आहे.

मलाया द्विपकल्पातील गणेशमूर्तींची सोंड एकतर सरळ किंवा ती सरळ डोक्यावर धरलेली असल्याचे आढळून येते. जावा बेटातील गणेश अत्यंत सुन्दर

व आकर्षक असे आहेत. ब्रम्ही लोक गणपतीला 'महापिएन' नावाने संबोधतात व त्याची अनन्यभावे पूजा अर्चा करतात. कंबोडीया देशात गणेशाला 'केनेस' असे नामाभिधान आहे. सयाम व चंपा या ठिकाणी रहाणाऱ्या लोकांच्या घरी एकाहून एक सुंदर अशा गणेश मूर्ती असून तिथे शिवाचा गणेशाशी संबंध दाखविलेला आढळतो. पण तिथे उंदीर हे वाहन मात्र दिसत नाही.

चीन व जपानमध्ये गणेशाला 'कांचि-तेन' नावाने ओळखले जाते. जपानमध्ये तीन मस्तके व सहा हात असलेले गणेश असून तेथील बौद्ध मंदिरातून त्यांचे मोठ्या भक्तिभावाने पूजन रोजच्या रोज होत असते. हातात मूळा घेतलेली गणेशाची एक मूर्ती जपानमध्ये आढळली आहे. गणपतीने हातात मूळा घेतल्याचा उल्लेख भारतीय पुराणात कुठेच आढळत नाही. पण गणपतीला मूळा फार आवडतो अशी जपानी लोकांची श्रद्धा आहे. जपानी भाषेत गणपतीला 'शो-तेन' असे म्हणतात.

मंगोलियात तिबेटातील 'पाठसफा' या धार्मिक पक्षाचा उदय होण्यापूर्वी महायान बुद्ध धर्म त्या प्रदेशात तेराव्या शतकात प्रचारात आला होता व त्या धर्माने त्या देशाचा राजा कुबलाईखान याला बुद्ध धर्मीय केले होते. या बादशहाच्य पित्याने गणेशाच्या मदतीची याचना केली तेव्हा गणेशदेव त्याच्या पुढे प्रगट झाला व त्याला आपल्या सोंडेने उचलून मेरु पर्वताच्या माथ्यावर नेले व मंगोलियाचा प्रदेश दाखवून म्हटले की, 'तुझा मुलगा हा प्रदेश पादाक्रांत करील' याप्रमाणे बुद्धधर्मात किंवा बुद्ध धर्मीय प्रदेशात गणपतीची स्थापना किंवा आराधना सुरू झाली अशी नवलकथा आहे.

सयाममधल्या स्पीनमार या गावी खाजगी संग्रहात असलेल्या एका बैठ्या मूर्तीचे हात गुडघ्यावर टेकलेले असून त्यामध्ये न समजल्या जाणाऱ्या अशा विविध वस्तू आहेत. पायांना अढी आहे, व ती घोट्याजवळ आहे यामुळे ते पाय कमरेच्या दिशेला वळलेले दिसतात. या अजब मूर्तीला चार मस्तके असून ती चार दिशांना आहेत. बोर्निओतील गणेशाचे गळ्यात यज्ञोपवीताऐवजी सर्प दिसून येतो. अमेरिकेतील रेडइंडियन व मेक्सिको निवासी मानवी धड व हत्तीचे मस्तक असलेल्या एका मूर्तीची आजही पूजा करतात ही मूर्ती त्यांचे आराध्य दैवत आहे.

वाचकहो, या वरील उल्लेखांवरून गणेश हा देव त्रिखंडातही पूजिला जातो हे दिसून येईल. चला आपणही त्याची पूजा अर्चा या मंगल समयी करूया.

..............

# ब्रम्हचैतन्याचे तळपते सूर्यबिंब !

## श्रीभालचंद्र महाराज (कणकवली)

–सुरेश शांताराम सातपुते
द्वारा: सातपुते स्टोअर्स, ४९८, जाम बिल्डींग,
लालबाग, मुंबई नं. १२.

★



★ ★

● श्रीमद् भालचंद्र महाराजांविषयी दोन शब्द लिहावे म्हणून पेन उचलले. वाटले होते, खूप खूप लिहीन... पण नेमकी सुरवात कोठे करावी यावरच अडले ! त्या महान ब्रह्मस्वरुप योगी पुरुषाचे वर्णन करण्यासही चिमुकली लेखणी अन् टिचभर कागद पुरे होतील काय ? डबक्यातील बेडकाप्रमाणे आपण...त्याच्या मायेच्या जगातील कळसूत्री बाहुली ! आपल्या बुद्धीचा आवाका तो किती ? ...अगदी बेडकाच्या कल्पनेतील बैलाएवढाच ! त्याचे यथार्थ वर्णन करणे आपल्याला शक्य आहे काय ? कारण–"अठरा भार वनस्पतीची लेखणी केली... समुद्राची शाई करून

संपूर्ण भूतलाचा कागद केला तरी त्याचे गुणवर्णन करताच येणार नाही. पण तरीही, "वेडे वाकडे गाईन, परी तुझे नाम घेईन!" या उक्तीप्रमाणे हा वेडावाकडा प्रयत्न आहे पण, त्यालाही श्रीबाबांची अंतः प्रेरणा आहेच! कणकवली येथील या महान योग्याचा साईभक्तांना परिचय करून देताना मला परमानंद वाटत आहे. त्यांच्या संबंधी ही अक्षरे येथे लिहिली जावीत हादेखील साईनाथांचाच संकेत आहे. श्री समर्थ साईनाथाप्रमाणे श्रीमद् भालचंद्र महाराज हे देखील "**नाथ-पंथी**" योगी आहेत.

परंतु ते नाथपंथी असले तरी, पूर्णपणे दिगंबर अवस्थेतच असतात. अत्यंत कृश शरीरयष्टी, हाडाचा सापळा झालेला देह! नुकत्याच जन्मलेल्या बालकाप्रमाणे ...निर्वीकार पण भिरभिरणारे डोळे, अनेक वर्षांच्या तपश्चर्येने आखडलेले पाय व त्यामुळे झालेले शरीराचे मुटकुळे पाहिले म्हणजे प्रथम थोडेसे विचित्र वाटते... पण, एकदा का त्यांच्या नजरेला नजर भिडली की, माणसाचे देहभान हरपल्या खेरीज रहातच नाही. श्रीमद् महाराज हे गेल्या ३६ वर्षापासून मौन पाळीत आहेत असे म्हटले तरी चालेल. कारण अगदी क्वचित. एकाद्याचे भाग्य असेल तरच महाराज एकादा शब्द उच्चारतात नाहीतर सारा कारभार खाणाखूणावरच!

## सदा सर्वदा तुर्याअवस्थेतच :

आपल्या दर्शनास येणाऱ्या जीवांचे हेतू विविध आहेत. हे महाराज अंतर्यामी जाणून असतात पण, त्यांना उत्तरे देऊन किंवा तोंडाने उघडपणे बोलण्याचा प्रपंच न करीता फक्त मौन वृतीनेच साऱ्या गोष्टीची उकल करतात. पण हाही योग क्वचितच, कारण...श्रीमद् महाराज हे अखण्ड तुर्यावस्थेतच असतात. म्हणून शेकडोंच्या रांगा लागल्या किंवा किती डोकी स्वतःचा पायावर आदळली याची दखल महाराजांना नसतेच पण— ज्याच्यावर कृपा करायचीच त्याला तांदूळातून खडा टिपावा, त्या प्रमाणे वेचून काढतात..! आणि कृपा म्हणजे कशी? फक्त एखादा नेत्रकटाक्ष! बस्स...! झालेच त्याचे काम!

## ३६ वर्षांची भगीरथ तपश्चर्या :

श्रीमद् महाराजांचे पूर्ण नाव भालचंद्र परशुराम ठाकूर. मूळ गाव म्हापण. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोचरे या गावी झाले. महाराजांचे घराणे दत्तभक्त म्हणून प्रसिद्ध होते. मॅट्रीक परीक्षेत अपयश आले म्हणून महाराजांना वैराग्य प्राप्त झाले असा एक प्रवाद आहे. पण त्याच दरम्यान त्यांनी घर सोडले व श्रावण महिन्यात १९२४ साली ते कणकवलीस आले ते संपूर्ण नग्नस्थितीतच! कणकवलीत लोक त्यांना दगड मारीत...झाडूनी...काठ्यानी मारीत, हा कुणी वेडा...माथेफिरू भिकारी

आला आहे असे म्हणत, पण महाराज हे सारे निमुटपणे सहन करीत होते. हूं नाही की, चूं नाही. महाराज बहुधा कणकवलीतील सुप्रसिद्ध श्रीकाशीविश्वेश्वर मंदिरासमोरील दोन झाडांच्या बेचक्यात आसनस्थ पडलेले असत, गावात फिरणे नाही... कोणाकडे काही मागणे नाही...दिले तर फेकून द्यावे...निर्वीकार चेहऱ्याने बसावे मुलांनी दगड धोंडे मारावे...लोकांनी तिरस्काराने पहावे...पण कुणी निंदा अथवा वंदा...महाराजांचा स्वहिताचा धंदा चालूच राहिला...ते पावसाच्या सतत धारेत तिथं उभे रहात...कोणी कधी...हातावर काही ठेवलंच तर... हात तोंडापर्यंत कधी गेलाच नाही. हातावरील पदार्थ तासन् तास तसाच पडून राह्यचा !

एकदा महाराजांची स्वारी काशी विश्वेश्वराच्या मंदिरा नजिक असलेल्या मारुतीचे देवळात, मारुतीचे मूर्ती पाठीमागे पडलेली आढळली त्या वेळी श्रावण महिना असल्याने महिला देवांना तांदूळ मूठी वाहत परंतु या वेड्याच्या वागणुकीमुळे त्यांना प्रदक्षणा घालणे अशक्य होई. कारण महाराजांना मलमूत्र विसर्जनाची सुद्धा क्षिती नव्हती. म्हणून लोकांनी त्यांना तेथून हुसकून काढले. तद्नंतर काही दिवस स्वारी, देवळा समोरील बागेत आंब्याच्या झाडाखाली भर पावसातच उभी होती.

अशा रितीने १६ वर्षांचा काल गेला. सन १९४० सालपर्यंत यात बदल नाहीच झाला. परंतु पुढेही मौन व्रत चालूच ! एकाग्र चित्तात चंचलतेचा मागमूसही नाही. यानंतर मात्र लोकांना महाराजांची महती पटू लागली. गावोगावाहून लोक येत-कोणी स्नान घालीत. कोणी खाणे पिणे देत. पण महाराजांचे लक्ष यापैकी कसल्याच ठिकाणी नसे. तीच अनंताचा वेध घेणारी नजर. मौनव्रत चालूच राहिले. अशा रितीने आणखी २० वर्षे गेली. महाराजांचे तपश्चर्येला जवळ जवळ तीन तपे झाली आणि मधल्या काळात बाबांची महतीही चंदनाचे सुवासाप्रमाणे चारी बाजूला पसरली. गाड्या गाड्यांनी लोक श्रीमद् महाराजांचे दर्शनाकरिता येऊ लागले. श्रीसद्गुरु साटम महाराजही कधी कधी महाराजांना भेटण्यास येत असत.

## सिगरेटचा चटका ! -प्रसादाचा विलक्षण :

श्रीमद् महाराजांचे, कृपा प्रसाद देण्याचे मार्गही लोकविलक्षण आहेत. एखाद्यास प्रसाद द्यायचा झालाच तर महाराज हातातील पेटत्या सिगरेटचा चटका देतात. पण, तेसुद्धा मनात आलेच तर– नाहीतर शेकडो लोक पायावर डोके ठेवून गेले तरी महाराज हातात सिगरेट धरून एकाद्या स्थित प्रज्ञासारखे हातातील सिगरेट गोल गोल फिरवीत तिच्याकडे टक लावून पहात बसतात. याशिवायही अधिक कृपेचा प्रसाद म्हणजे थपडा किंवा चापट्या मारणे. पेटती सिगरेट अंगावर भिरकावून देणे. कधी मनात आले तर फाऽडकन् श्रीमुखातही भडकवून देण्यात येते. एखादा

दुखणा खुपणारा माणूस गेला म्हणजे महाराज न सांगता सवरताच सिगरेटचा एक चटका त्याला देतात अन् तत्क्षणीच तो दुःख मुक्त होतो.

## महाराज स्वतःच एक चमत्कारः

श्रीमद् भालचंद्र महाराज स्वतःच एक चालता बोलता चमत्कार आहेत. महाराजांनी आजपर्यंत कसलेही लौकीक चमत्कार केलेले नाहीत. तरीही जीव ब्रह्म सेवा करीत असताना जी काही आश्चर्ये घडली त्यांची जंत्री देणे अशक्य आहे. महाराजांचा मुक्काम मुंबई येथे असताना, एक स्त्री आपल्या अंध मुलीस घेऊन आली. ही स्त्री केवळ महाराजांचे दर्शन व्हावे इतक्याच हेतूने आली होती. पण त्या मुलीचे दैव बलवत्तर! महाराजांना कृपा करण्याची लहर आली. मुलीने मस्तक पायांवर टेकवताच महाराजांनी अकस्मात् दोन्ही हाताने तिचे मस्तक पकडले व आपले दोन्ही आंगठे जोराने तिच्या दोन्ही डोळ्यात खुपसले. मुलगी जोरात किंचाळली. किंचित् रक्तही आले पण थोड्याच दिवसात मुलीस चांगले दिसू लागले–मग त्या माय माऊलीचा आनंद काय वर्णावा ! ती हार पेढे इत्यादी घेऊन महाराजांचे मुक्कामावर गेली. पण महाराजांनी त्या पूर्वीच मुंबई सोडली होती.

श्रीमद् महाराजांचे बाबतीतील "चक्षुर्वयै सत्य" हकीकत वाचकांना खात्रीने मनोरंजक वाटेल...आमच्या चाळीतील शेजाऱ्यांचा एक नातेवाईक तरुण, किंचित् भ्रमीष्टासारखा वागत असे. एके दिवशी तो महाराजांचे दर्शनास गेला...त्याचे भाग्य उजाडले...महाराजांनी स्वतःहून त्याच्यापाशी सिगरेट मागितली, त्याने ती दिल्यावर महाराजांनी जोराने, तिचे एक...दोन झुरके घेतले...अन् आकस्मिकपणे ताऽडकन् ती पेटती सिगरेट त्याच्या अंगावर भिरकावली...आणि फाऽटदिशी एक श्रीमुखात भडकावली...झाले वेडाचा मागमूसही उरला नाही. सध्या हा तरुण नोकरी वगैरे व्यवस्थित संभाळून आनंदात रहात आहे.

## बाळासाहेबांना मृत्यूपाशातून मुक्त केले

एकदा श्रीमद् महाराजांचे परम भक्त श्री बाळासाहेब उचले यांना जीवावरचे दुखणे आले. कोल्हापूरचे रुग्णालयात ते साक्षात मृत्यूशय्येवर पडले होते. त्यांचे एक "मेजर" ऑपरेशन होणार होते. त्यातूनही ते वाचतील, अशी आशा तेथील डॉक्टरांना बिलकूल नव्हती. पण–ऑपरेशनच्या दिवशी चमत्कार झाला. महाराजांनी वर्षानुवर्षांची आपली बैठक मोडून...खूरडत...खूरडत जाऊन कोणाच्या तरी मोटारीत बसले–त्या माणसानेही, कोणाचा तरी हुकूम व्हावा त्या प्रमाणे– कोल्हापूरचे दिशेने गाडी सोडली. कोल्हापूरास पोहचल्यावर महाराजांनी सरळ रुग्णा-

लयाकडे बोट दाखविले. गाडी तिथे पोहचली. महाराज गाडीतून खाली उतरले, अन् खुरडत खुरडत सरळ आत शिरले, तत्क्षणीच ऑपरेशन आटोपून बाळासाहेबांना बाहेर आणण्यात येत होते. महाराजांनी हाताच्या इशाऱ्यानेच स्ट्रेचर थांबवली, व साक्षात मृत्युशय्येवर बेशुद्ध स्थितीत असलेल्या बाळासाहेबांच्या चेहऱ्यावरून आपला हात फिरवला, स्ट्रेचर नेण्यासाठी इशारा केला, व हा दिगंबर कलंदर सत्पुरुष पुन्हा बाहेरच्या गाडीत येऊन बसला. गाडी कणकवलीच्या दिशेने भरधाव निघाली. इकडे बाळासाहेबांना पुर्नजन्म लाभला.!

## कुत्र्यांना विष बाधलेच नाही :

महाराजांचे आसपास सदासर्वदा ठराविक दहा, बारा कुत्री घुटमळत असत. एके वर्षी कणकवलीत प्लेग आला. भटक्या कुत्र्यांचा निष्कारण उपद्रव नको म्हणून कणकवली नगरपालिकेने कुत्र्यांना विष घालून मारण्यास सुरुवात केली—इतर कुत्री पटापट मेली ! पण महाराजांचे जवळ घुटमळणाऱ्या कुत्र्यांवर काहीच परिणाम झाला नाही !

## अर्धा किलो तांदूळात तिघाना जेवण :

श्री. ढाके नावाचे गृहस्थ महाराजांचे परम भक्त आहेत. एकदा त्यांचेकडे तीन सत्पुरुष आले. हे अकस्मात् न सांगता-सवरताच आलेले. घरात त्यावेळी धान्य शिल्लक नव्हते. फक्त अर्धा किलो तांदूळच काय ते होते, पण संताना विन्मुख कसे पाठवायचे ? बरे, अर्धा किलो तांदूळात तिघाना कसे वाढणार ? व खेड्यापाड्यातही रेशनींग कंट्रोल. आणि तिथे धान्य किती वेळेवर मिळते, ही गोष्ट सर्वांना माहीत आहेच. पण, सौ. ढाके डगमगल्या नाहीत. त्यांनी महाराजांचे स्मरण करून त्या अर्धा किलो तांदळाचाच भात शिजवला, आणि आश्चर्य असे की, तिघेही सत्पुरुष जेऊन उठले तरी अर्धा किलो तांदळाचा भात भांड्यात शिल्लकच होता. ही कथा स्वतः श्री. ढाक्यांनीच 'भालचंद दर्शन' विशेषांकांत लिहिली आहे.

## सतरा वर्षे बेपत्ता असलेल्या नवऱ्याने पैसे पाठविले :

काशीबाई मुसळे नावाची एक क्षयाने पछाडलेली स्त्री महाराजांपाशी एकदा आली. तिचा नवरा गेल्या सतरा वर्षापासून बेपत्ता होता. पती नाही. शरीरही धड बरे नाही...तरीही ती औषधोपचार कसे तरी घेत होती पण त्यानेही गुण येईना. ती महाराजांना शरण गेली. महाराजांनी तिला ताबडतोब रोगमुक्त केले, व आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्याचवेळी तिच्या सतरा वर्षे बेपत्ता असलेल्या नवऱ्याकडून ५०० रुपयांची मनीऑर्डर तिला आली.

## हवा व रॉकेलशिवाय पेट्रोमॅक्स रात्रभर पेटला :

श्री. ढाके हे बाबांचे परम भक्त आहेत याचा उल्लेख आलाच आहे...याच ढाक्यांच्या लेखणीतून उतरलेला दुसरा एक अनुभवही वाचकांना खात्रीने मनोरंजक वाटेल.

एके दिवशी पावसाळ्यात महाराज ढाके यांचे घरी येणार असा श्री. ढाके यांना निरोप आला...ढाके, महाराज येणार म्हणून आनंदले...घरात इतर वस्तू होत्या...पण रॉकेल नव्हते...रात्री भजन, कीर्तन होणार म्हणजे पेट्रोमॅक्स पेटवलाच पाहिजे! त्यावेळी रॉकेलची टंचाई होती...हे वेगळे लिहिण्याची जरूरी नाही ...मुंबईतही रॉकेल नेहमी उपलब्ध नसे यावरून कणकवलीसारख्या ठिकाणी काय स्थिती असेल याची वाचकानीच कल्पना करावी! असो.


संध्याकाळी पाच साडेपाच वाजले. पाऊस धुवांधार कोसळू लागला तरी महाराजांचा पत्ता नाही...ढाक्यांची निराशा मिनिटागणीक वाढत चालली...पण अचानक भरपावसात वाजंत्री, ताशांचा आवाज ऐकू आला...अखेरीस महाराज आले. घरात होते तेवढे रॉकेल ओतून श्री. ढाक्यांनी पेट्रोमॅक्स पेटवला...वास्तविक तासभर जेमतेम जळेल इतकेच रॉकेल त्यात होते. भजन कीर्तन चालू झाले... पण ढाक्यांच्या जिवास एकच धाकधूक...पेट्रोमॅक्स मध्येच विझणार तर नाही...? पण...भजन किर्तन संपले तरी पेट्रोमॅक्स चालूच...! पुन्हा सर्व झोपण्याची तयारी झाली, महाराज एका खाटेवर पहुडले होते...त्यांच्या शेजारी टेबलावर पेट्रोमॅक्स ठेवावा असे ढाक्यांना वाटले...पण न जाणो, एखादेवेळी महाराजांचा मूड बिघडला तर, पेट्रोमॅक्स फेकून द्यावयाचे...अखेरीस धीर करून महाराजाजवळ पेट्रोमॅक्स त्यांनी ठेवला...थोड्याच वेळात निजानिज झाल्यावर ढाक्यांनी कंदील पेटवून तेथे ठेवला...व पेट्रोमॅक्सची हवा सोडून दिली... पण... काहीवेळ गेला तरी पेट्रोमॅक्स जरासुद्धा मंद होईना...अखेरीस त्यांनी न राहवून पुन्हा पेट्रोमॅक्स हातात घेऊन हलवून पाहिला... आत रॉकेल नव्हतेच...पुन्हा त्यांनी चावी ढीली केली तर ती हातातच आली...परत ढाके अंथरूणावर येऊन पडले...झोपण्याची सोयच नव्हती...महाराज मध्येच उठून कुठे गेले तर..नाही ती आफत! म्हणून ते रात्रभर जागेच राहिले. कंदिल केव्हाच विझला आणि रात्रभर पेट्रोमॅक्स सतत जळत राहिला...अगदी उजाडेपर्यंत सकाळी महाराजांनी ढाक्याकडे पाहून एक स्मित हास्य केले...हाच एकमेव महाराजांचा लौकिक चमत्कार आहे...पण तोही केला....भक्ताची लाज राखण्यासाठीच! एरवी हवेतून विभूती काढणे....फुले

काढणे....पेट्रोलशिवाय गाडी चालविणे असले काहीच चमत्कार महाराज करीत नाहीत. पण जीवावर दया करताना, घडलेल्या विस्मयजनक घटनांची संख्या मात्र असंख्य आहे.

## महाराजांची कुंडली :

ज्योतिषी, अभ्यासू व जिज्ञासू करीता महाराजांची 'जन्म लग्नकुंडली' मुद्दाम देत आहे. याशिवाय परमार्थिक उन्नती करीता कोणते ग्रहयोग फलदायी ठरतात याविषयीही थोडे लिहावे या हेतूनेही हा विषय मध्येच घातला आहे. कुठलेही भाकित वर्तविण्याचा हेतू मूळीच नाही. कारण लेखक तज्ञ ज्योतिषी नाही. फक्त 'त्याच्याच' कृपेने जे काही अवगत झाले...त्याचा 'त्याच्याच' अभ्यासासाठी काय उपयोग होतो ते पहावे इतकाच उद्देश आहे तसेच महाराजांस 'ईश्वर स्वरुप' होण्यास प्रारंभी कोणते ग्रह कारणीभूत झाले याचाही अभ्यास व्हावा असे वाटते..

जन्म तारीख : ८ जानेवारी १९०४
शुक्रवार पौष व. ६ शके १८२२
उत्तरा नक्षत्र, जन्म वेळ : सकाळी १०:३० ते ११




प्रथमतः परमार्थिक उन्नतीस कोणते ग्रह व योग साक्षीभूत होतात याचा विचार करणे व कुठल्या स्थानांवर याचा विचार केला पाहिजे याची कल्पना देऊन श्रीमद् कोणत्या ग्रहयोग बलाने 'ईश्वर स्वरुप' झाले याचे विवेचन करतो.

फल ज्योतिष शास्त्रात पंचमस्थान, पंचमातील ग्रह व पंचमेश ह्यांचा परमार्थातील उपासना, जपजाप्य, योगसाधना इ. गोष्टींचा जवळचा संबंध आहे. 'शुक्र' हा परमार्थातील भक्तीचा कारक ग्रह आहे. 'गुरु,' भक्ती तत्वाचे ज्ञान व स्वरुप समजावून देणारा ग्रह आहे. 'केतू' व 'शनि' साधकांस पूर्ण वैराग्य देऊन परीपूर्ण करणारे आहेत. इतर कुंडल्यात दुय्यम समजल्या जाणाऱ्या 'केतूस' परमार्थाच्या दृष्टीने विशेष महत्व आहे. विशेषतः गुरुच्या राशीतील ( धनू, मीन ) केतू परमार्थ साधनांस विशेष शुभ होतो. तसेच पंचम स्थान व मोक्ष त्रिकोणातील सुख, मृत्यू व व्यय. (४–८–१२) ही स्थाने, त्यांचे भावेश या संबंधी विचार व्हावयास हवा. हर्षल व नेपच्यून हे दोन ग्रह आणि "तुर्या अवस्था" यांचा संबंध अगदी जवळचा आहे. हर्षल व नेपच्यून यांच्याशी, वर सांगितलेल्या स्थानांचे भावेश, ते

योग करतात यावरुन योगसाधना म्हणजेच शरीरवृत्तींचा विरोध कितपत जमेल यांचा अंदाज करता येतो. तसेच हर्षल व नेपच्यूनचे रवि (शरीर) चंद्र (मन) बुध (बुद्धी) या तीन ग्रहांशी होणाऱ्या योगास अध्यात्मिक कुंडलीत महत्व आहे.

वरील दृष्टीकोनातून महाराजांचे कुंडलीतील ग्रहयोग पहा– लग्नस्थानी शनी-सारख्या अध्यात्मिक ग्रहाची राशी उदीत आहे. शनि हा स्वतः कडक शिस्त व कठोर कर्तव्यता याचा कारक असल्याने जपजाप्य, योग साधनादी गोष्टीस लागणारी चिकाटी देतो. पुन्हा हाच शनि, लग्नेश बनून मोक्ष त्रिकोणातच अध्यात्मिक स्थानात पडला. स्वग्रही बलीष्ठ असलेल्या शनिमुळेच महाराज कठोर तपश्चर्या करू शकले! तसेच लग्नी गुरु हाही अध्यात्माकडे कल असणारा योग आहे. तसेच मागे सांगिल्या प्रमाणे नेपच्यून व रवि यातील प्रथम दर्जाचे योग हेही उन्नती देणारे आहेत. महाराजांचे कुंडलीत नेपच्यून पंचमातच असून त्याची रवीशी प्रतियूती आहे. या शिवाय पंचमेश व्ययात हाही परमार्थिक उन्नतीस पाठबळ देणारा योग आहेच. वर म्हटल्याप्रमाणे मीन राशीतील केतू अध्यात्मिक उन्नती दर्शवितो. नेपचून आणि गुरु यांच्यामध्ये होणारा नवपंचम योग व व्ययस्थानात असलेली शनि बुध युती हे परमार्थात प्राविण्य देणारे आहेत. श्रीमद् गोंदवलेकर महाराज यांच्याही कुंडलीत वर सांगितलेले ग्रह योग आहे. त्याचप्रमाणे गोंदवलेकर महाराजांचे कुंडलीतही कुंभ लग्नच उदीत आहे. थोडक्यात गोंदवलेकर महाराज व श्रीमद् भालचंद्र महाराज या दोघांचे कुंडलीत बरेच साम्य आहे.

महाराजांचे वास्तव्य अजुनही कणकवलीतच काशी विश्वेश्वर मंदिरानजिक आहे. परंतु महाराज कधी कधी मुंबईसही येतात. (भक्त घेऊन येतात.) तेव्हा त्यांचा मुक्काम माझगाव येथील त्यांचे परमभक्त व सुप्रसिद्ध "रतन ज्योत" या टुथ पावडरचे निर्माते श्री. श्रीधर यशवंत रेवंडकर यांच्याकडे असतो. हा लेख लिहिण्यास त्यांचे मला खूप सहाय्य झाले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच "भालचंद्र दर्शन" ह्या विशेषांकाचे लेखक व संयोजक यांचाही मी ऋणी आहे.

महाराजांचे सर्व भक्तांनी मिळून श्रीमद् महाराजांचा प्रचंड मठ बांधण्याचे काम कणकवलीत जोरात चालू केले आहे. श्री समर्थ स्वतःच कार्यास समर्थ असल्याने ते काम अतिशय रम्य व त्वरीत होईल यात शंकाच नाही.

परमानंद मनी । हरी देखिला नयनी । असा ज्यांना याच देही, याच डोळा घ्यायचा असेल त्यांनी एक वेळ अवश्य महाराजांचे दर्शनाचा लाभ घ्यावा, पण

महाराजांचे मुंबईतील आगमन अनिश्चित असल्याने त्या संबंधी काहीच लिहिता येत नाही याबद्दल लेखकास अत्यंत खेद वाटतो.

अखेर त्यांच्याच कृपेने ही अक्षरे लिहिली म्हणून—

बाबांचेच कृपेने गिरविलीं अक्षरे।
सर्व श्रेय त्यांनाच अर्पीतो नमस्कारे।

असे म्हणून लेखणी खाली ठेवतो.

|| जय भालचंद्र नाथ ||

|| श्रीसाईनाथार्पणमस्तु ||

★

**प्रदर्शन ! प्रदर्शन ! प्रदर्शन !!**

## भगवान श्रीसाईबाबांच्या छायाचित्रांचे व सर्व भाषेतील प्रकाशित श्रीसाई साहित्याचे अपूर्व प्रदर्शन

श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथी निमित्ताने शिरडी येथे येत्या नोव्हेंबर महिन्यात दिनांक १४ ते २१ तारखेपर्यंत एक भव्य प्रदर्शन भरविण्यात येत आहे. या प्रदर्शनात श्रीसाईबाबांची आतापर्यंत उपलब्ध असलेली सर्वप्रकारची लहान मोठी व रंगीत छायाचित्रे तसेच आतापर्यंत प्रकाशित झालेली लहान मोठी सर्व भाषेतील श्रीसाईबाबांच्या वरील पुस्तके, ग्रंथ आणि विविध भाषेतील नियतकालिके यांचा प्रामुख्याने समावेश असेल. हे प्रदर्शन आठवडाभर केवळ भक्तांसाठी खुले ठेवण्यात येईल. पुढे हेच प्रदर्शन सवडीने दादर येथे भरविण्यात येईल.

या भव्य व अपूर्व प्रदर्शनात ज्या साई भक्त लेखकांना आपल्या साहित्य कृती ठेवायच्या असतील त्यांनी आपापल्या साहित्याच्या दोन प्रती संपादक श्रीसाईलीला, साई निकेतन, ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई, ४०००१४ या पत्त्यावर ५ नोव्हेंबर १९७७ पर्यंत रवाना कराव्यात. या प्रदर्शनात विक्री मात्र करण्यात येणार नाही.

—कार्यकारी संपादक श्रीसाईलीला.

# श्रीसाईबाबा मंदिर, कर्नाळा

● श्री. राजाराम हुमणे
६ ज्ञानदेवी, साहित्य सहवास, बांद्रा ५१

● कर्नाळा पक्षी अभयारण्यापासून अगदी नजिक एक नवे साईबाबा मंदिर उभारण्यात आले आहे. मुंबईपासून दीड तासाच्या रस्त्यावर पनवेल तालुक्यात खारपाडा आपटा मार्गावर पाताळगंगेच्या काठी निसर्गरम्य परिसरात उभारण्यात आलेल्या या मंदिराचे उद्‌घाटन मुंबई जनता पक्षाचे अध्यक्ष प्रा. ग. भा. कानिटकर यांच्या शुभहस्ते रविवार दिनांक १५ मे १९७७ रोजी झाले. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा शुक्रवार दिनांक १३ मे रोजी करण्यात आली.

हे मंदिर सुप्रसिद्ध सिद्ध साईभक्त श्री. ए. एम्. उर्फ बाबा गायतोंडे यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या श्रीसाईसेवा समितीतर्फे उभारण्यात आले आहे. श्री. बाबा गायतोंडे हे गोव्यातील शांतादुर्गाचे उपासक परंतु १९४९ मध्ये गोवा सरहद्द भारतीयांना बंद झाल्यावर श्री. बाबा गायतोंडे, श्री. विठ्ठल वामन रत्नाकर व श्री. चिटणीस यांच्या समवेत शिर्डीला गेले. या तिघांनाही बाबांनी एकाच वेळी दृष्टान्त दिला. श्री. रत्नाकर महाराजांनी बदलापूर येथे साई मंदिराची स्थापना केली असून अनेक साईभक्त तेथे दर्शनासाठी जातात. श्री. गायतोंडे हे प्रसिद्ध ज्योतिषीही आहेत. त्यांचे आजोबा ( वडिलांचे काका ) आणि पोलिस खात्यात असलेले त्यांचे वडील हे दोघेही ज्योतिषशास्त्रात पारंगत होते. त्यांचाच वारसा श्री. बाबा गायतोंड्यांनी उचलला आहे. ज्योतिषशास्त्र आणि साईभक्ती यांच्या आधारावर श्री. बाबा गायतोंडे यांनी शेकडो दुःखी आणि पीडित यांच्या जीवनात नवचैतन्य आणलेले आहे.

मंदिराच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. ग. मो. पाटील यांनी या मंदिराची पूर्वपीठिका समजावून सांगितली. अध्यक्ष प्रा. कानिटकर यांनी सांगितले, "मंदिरे ही समाजसेवेची केन्द्रे बनली पाहिजेत. कर्नाळा येथील साईमंदिर या भागातील गोरगरीबांची सेवा करील अशी मला आशा वाटते. कारण स्वतः श्रीसाईबाबा गरिबांची सेवा हे ईश्वरभक्तीचे रुप मानत." सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. राजाराम हुमणे यांनी

आभार मानताना श्री. गायतोंडे यांनी केलेल्या मानवतेच्या सेवेची अनेक उदाहरणे सांगितली.

या कार्यक्रमासाठी मुंबईहून अनेक साईभक्त खास बसने आले होते. परिसरातील अनेक मंडळीही उपस्थित होती. श्री. शांताराम ना. पाटील यांनी या मंदिरासाठी जागा विनामूल्य दिली, व श्री. बोरकर व श्री. रानमाडे यांनी बांधकामात मोलाचे सहकार्य दिले.

..............


## संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबा

### आता लौकरच प्रकाशित होणार

: लेखक :

● **श्री. का. सी. पाठक**

कोर्ट रिसिव्हर, श्रीसाईबाबा संस्थान

● **सदानंद चेंदवणकर**

कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला

+ श्रीसाईबाबांचे सचित्र चरित्र

+ श्रीसाईनाथकालीन व्यक्तींची भरपूर छायाचित्रे

+ श्रीसाईनाथांचे मुखपृष्ठावर संग्राह्य चित्र

**श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे नवे प्रकाशन**

जन्मतिथी निमित्य खास लेख

## सातारा-पाटणचे थोर सत्पुरुष

# श्रीकृष्णबाबा अडुळकर

-लेखक श्री. अमृतराव सरगडे
शीव कोळीवाडा



● आडूळ हे गाव सातारा जिल्ह्यात पाटण तालुक्यात कोयना नदीचे काठी आहे. सन १८८९ मध्ये भाद्रपद महिन्यात गणेशचतुर्थीस कृष्णबाबांचा येथे जन्म झाला.

कृष्णबाबांना वयाच्या आठव्या वर्षी महारोग जडला, त्यामुळे त्यांच्या आई सोयराबाई व वडील यांना फार दुःख झाले. बाबांच्या अंगी महारोग जडल्यामुळे त्यांनाही फारच दुःख झाले. अंग कळाहीन झाल्यामुळे जगणे त्यांना लाजीरवाणे वाटू लागले. मुलांच्याबरोबर खेळता येईना, कोणी खेळण्यास की बसण्यास बोलविना. अशा स्थितीत त्यांचे जगणे त्यांना कठीण झाले. आई, वडील काही दिवसानी तर बघण्यासमुद्धा तयार होईना. जेवण वेळेवर नाही. आई जेवण वेळेवर देत नसे मग दुसरे कोण जेवण देणार ? अशा सर्व तऱ्हेचा कृष्णबाबांना त्यावेळी —अनुताप झाला. आई, वडील, घरदार यांचा त्यांनी त्याग केला आणि ते कोयना नदीकाठी

जाऊन एका झाडाखाली राहिले. तेथे ते आपल्या शरीराला जे दुःख झाले आहे. यासंबंधी विचार करू लागले.

देवाने जन्म दिला. त्यानेच देहाला दुःख दिले आणि ते दुःख मी देवाकडूनच बरे करीन, अशी बुद्धी त्यांनी मनी केली आणि त्या झाडाखाली बसून दगडाचे टाळ करून हरीनाम गात बसले. उन्हात झाडाने आपल्या सावलीचा आसरा दिला. रात्री चंद्राच्या प्रकाशाने शांतवन केले. तर अंधाऱ्या रात्री धुनी करून बाबा त्या ठिकाणी देवाचे स्मरण करीत रात्र संपवीत होते. पावसात त्यांनी झोपडी बांधली व तीत ते रहात अशा प्रकारे त्यांनी आपल्या वयाची बारा वर्षे काढली. कोणाला दया येईल त्यानी त्यांना तेथे नेऊन जेवण द्यावे आणि त्यावर ते उदरनिर्वाह करीत.

ज्याने जीव दिला दान । करीन तयाचे चिंतन
जगजीवन नारायण । गाईन गुण तयाचे ।। १ ।।

अशा तऱ्हेने बाबा देवाचे गुण गात बसत. या स्थितीत बाबांचे बालपण गेले. त्यांना त्यांच्या गावातील लोक चांगले मानू लागले. बाबांच्याकडे त्यांचे भजन ऐकण्यास काही भाविक लोक येऊ लागले व त्यांना जेवण देऊ लागले.

नदीकाठी लोकांनी शेवऱ्या लावल्या होत्या. त्या राखण करण्यास बाबांना एका शेतकऱ्याने सांगितले व ते बाबांनी कबूल केले. तो शेतकरी रोज जेवण देई. कार्तिक महिना आला. गावातील भाविक मंडळी आळंदीस निघाली. बाबांना लोक आळंदीस जातात हे समजले, आता काय करावे, शेवऱ्याची राखण घेतली. आळंदीस देवदर्शनास कसे जावे असा विचार पडला. नजीक एक पोळ रेडा उभा होता. बाबा त्याच्या जवळ गेले, आणि त्यांनी त्याला सांगितले की, या शेवऱ्याची राखण आम्ही घेतली आहे. आता आम्ही आळंदीस जात आहोत आम्ही येईपर्यंत शेवऱ्याची राखण कर. असे रेड्यास सांगून बाबा गावातील वारकऱ्यांबरोबर आळंदीस आले. आश्चर्य असे की, त्या रेड्याने बाबा परत येईपर्यंत मालकांसुद्धा शेवऱ्यास हात लावू दिला नाही. तो शेवऱ्याजवळ कोणी येईल त्याच्या अंगावर धावून जात असे. बाबा आळंदीहून परत आल्यावर गावातील सर्व लोकांनी बाबांच्या चरणावर लोळण घेतली. आपल्या पोटी देव जन्मास आला आहे. हे आई-वडिलांना समजले तेव्हा आईवडील बाबांच्याकडे जाऊन त्यांचे दर्शन घेऊन अपराधाची क्षमा मागू लागले. आपल्या मुलाचा देवावरील भाव पाहून आईवडीलांनी आपल्या पोटी देव जन्मास आले आहेत तेव्हा त्यांना घेऊन आपल्या घरी जावे. मग बाबांना त्यांचे आईवडील घेऊन घरी आले. घरी आल्यावर बाबांचा नित्यक्रम पहाटे उठून हरीनाम गात बसावयाचे. गावातील भाविक लोक त्यांच्याकडे येऊन बसत होते. देवाच्या भक्तीमुळे बाबांचे अंग चांगले दिसत होते. पण पाय एवढे चांगले दिसत नव्हते. तरी पण बाबा त्या दुःखाची पर्वा करीत नव्हते.

पुढे आषाढी वारी आली, वारकरी पंढरीस निघाले. तेव्हा बाबाही गावातील वारकऱ्यांबरोबर पंढरीस निघाले, तेव्हा ते वारकऱ्यांबरोबर उंब्रज या गावापर्यंत चालत आले. पाऊस पडत होता. त्यामुळे कृष्णा नदीस पाणी आले होते. पलीकडे जाण्यास तेथे नाव चालू होती. लोक नावेतून पलीकडे गेले. बाबांची स्थिती पाहून नावाड्याने बाबांना नावेत घेतले नाही. बाबांना राग आला, त्यांनी आपल्या अंगावरील घोंगडीची घडी करून ती पाण्यावर ठेऊन त्या घडीवर ते बसले, वहात वहात मध्ये गेले व ते कृष्णा नदीत बुडाले. काही वेळाने काही अंतरावर हातात हरीपाठ व गीता घेऊन कडेला आले. तेव्हा त्या गावातील सर्व लोक त्यांना बघण्यास तेथे जमले. त्यांनी बाबांचे दर्शन घेतले व त्यांना घेऊन मोठ्या थाटाने आडूळ गावी नेले. बरोबर आलेल्या लोकांनी सर्व हकीगत आई-वडिलांना व आडूळातील लोकांना सांगितली. हे कृत्य तुकाराम महाराज यांच्यासारखे झाले तेव्हा बाबांना लोक अक्षरशः देव मानू लागले. बाबा जे सांगतील त्याप्रमाणे घडू लागले. लोकांची दुःखे त्यांच्या सांगण्याने दूर होऊ लागली. बाबांचा जन्म गणेशचतुर्थीचा असल्यामुळे ते प्रतिवर्षी गणपती आणून त्याची पूजा करीत. एक महिना अनुष्ठान करीत. असा हा त्यांचा देवावरील भाव पाहून कोयना नदीच्या पलीकडील सांगवड गाव तेथील साधू हरीबाबा यांनी त्यांना आशिर्वाद देऊन गुरुमंत्र दिला. तेव्हा बाबांना फारच हिंमत चढली.

हरीबाबा त्यांचे गुरु । त्यांच्या जीवनाचे तारू
हरीबाबा गावचे पाटील । सोडली पाटीलकी साधुपणात.

हरीबाबांचे गुरु पलसकर धोंडीबुवा असा त्यांचा साधुपणाचा संबंध आहे.

कृष्णबाबा शिकले नव्हते शाळा । ते होते ज्ञान वैराग्याचा पुतळा । त्यांनी गीता व हरी पाठ हातात घेतली की त्यांना त्यातील सर्व गाता येत होते. शंकराप्रमाणे त्यांच्या अंगी विद्या निर्माण झाली होती. दरवर्षी एक महिना उपोषण करून हनुमान जयंतीच्या दिवशी उसाची रस कढविण्याची काईलभर खीर करून ते लोकांना धर्म करीत होते. धर्म करा धर्म करा । जेणे देव येती घरा । धर्म पांडवानी केला । अंगी देव राबविला अशा प्रकारे कृष्ण बाबांनी पांडवा सारखा धर्म करून देव हाती घेतला. कृष्णबाबांचा अवतार निळाचा होता. पांडवाना किती वनवास भोगावा लागला. कौरवांच्याकडून किती त्रास झाला पण ते श्रीकृष्णाचे स्मरण विसरले नाहीत. त्याप्रमाणे कृष्णबाबाही देवाचे स्मरण विसरले नाहीत. शरीरी एवढे दुःख असताना देवाचे स्मरण करणे हा किती देवावरील भाव. भाव तोचि देव. जैसा भाव तैसा देव । जया अंगी मोठेपण । तया यातना कठीण । बाबांच्या अंगी देवपणाचा मोठेपणा होता. तशा त्यांच्या शरीराला यातना पण होत्या. ह्या यातना देवाच्या भक्तीने दूर झाल्या. बाबांचे त्यावेळी तरूणपण होते. त्यांना

चांगले चालता येत होते. मग बाबा **काशी यात्रेस** निघाले. सोबत काही भाविक लोक होते. पण बाबांना आई काशीस जाऊ देईना. आई म्हणती तुज आता काय कमी आहे सांग मला मी ते प्राप्त करून देईन तुला. तेव्हा कृष्णबाबांनी आईला प्रश्न केला. स्तनाचे दूध द्यावे मग मी काशीस जाणार नाही. बाबांचा अवघड प्रश्न ऐकून माता विचार करू लागली. आता दूध स्तनी नाही ते तुला कसे देणार ? मग कृष्णबाबा आईस म्हणाले, आई ते दूध आणण्यास आम्हीं जातो काशीस। आले काशीं क्षेत्रास सकाळी स्नानास गेले. गंगेवर तेव्हा बडवे विचारू लागले, आमची द्यावी दक्षिणा मग करावे गंगास्नान. बाबांनी सांगितलें, आम्ही देतो ती दक्षिणा घ्यावी तेव्हा बडवे म्हणाले, तसे चालणार नाही आम्ही मागतो तेवढी द्यावी. बाबांनी सांगितले तुमची दक्षिणा न देता आमचे गंगेत अंग भिजले तर आम्ही तुझी दक्षिणा देणार नाही. हा प्रश्न ऐकून बडवे घेती बाबांचे दर्शन आणि हे महान संत आले काशीत, मग बाबा आपल्या सोबत्यासह गया, प्रयाग, अयोध्या, द्वारका, गोकुळ, नाशिक ही सेवातीर्थें करीत आपल्या गावी आले. गावी आल्यानंतर आपल्या बसण्याच्या ठिकाणी पिंडीची स्थापना केली आणि सर्व तिर्थांचा महिमा घरात बनविला.

बाबांची प्रसिद्धी सातारा जिल्ह्यात चोहीकडे झाली. तारळे गावी ते बरेच दिवस राहिले, तेथील सर्व लोकांनी बाबांना एकाच वेळी आंघोळ घातली पण शेवटी त्यांनीं आपले अंग कोरडेच दाखविले. तारळे गावी त्यांची सेवा गोणाबाई व विठ्ठलबुवा यांनी अखेरपर्यंत केली. ते आपसिंगे या गावी शंकर यांचे घरी राहिले होते. तेव्हा गावचे लोक त्यांना विचारू लागले, आपली प्रचिती दाखवा. तेव्हा बाबांनी त्यांना अशी प्रचिती दाखविली की, बाबा सीताफळाच्या झाडाखाली आंघोळ करीत होते त्या सिताफळास झाली रामफळे. तेव्हा गावातील सर्व लोक त्यांच्या चरणावर लोळण घेऊ लागले. नंतर बाबा आपल्या गावी गेले. बाबांनी लोकांना आपल्या भक्तीची प्रचिती अनेक ठिकाणी दाखविली. त्यांच्या गावाशेजारी डोंगर आहे. त्या डोंगरात मेनूबाईची घळ आहे. त्या घळीमध्ये बाबांनी सहा महिने शंकराचे तप केले. सहा महिने तेथे पूर्ण झाल्यावर त्या ठिकाणी पूजा घेतली. लोकांना गावातून पुजेचे सामान आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे लोकांनी गावातून सर्व पुजेचे सामान आणले. पण घळीत पाणी नव्हते. बाबांना रोज कोणीतरी लांबून पाणी नेऊन तेथे देत होते. पण पुजेला जेवणासाठी पाणी जास्त पाहिजे तेव्हा लोकांनी सांगितले, एवढया लांबून पाणी कसे आणावे ? हे विचार बाबांना समजले. बाबांनी सांगितले, पाण्याची चिंता करू नका, थोड्याच वेळात बाबा ज्या ठिंकाणी बसले होते तेथे वरुन दगडातून पाण्याची धार वाहू लागली. मग लोकांनी तेथे सत्यनारायणाची पूजा करून मोठ्या थाटाने बाबांना घेऊन घरी आले.

बाबांच्या गावचा सिताराम पेहेलवान हा महारोगाने त्रासून गेला. त्याचे जगणे त्याला कंटाळवाणे झाले. त्याने आत्महत्त्या करण्याचे ठरवून एके दिवशी सकाळी लौकर उठून आंघोळ करून सर्व देवांचे दर्शन घेतले व शेवटी बाबांच्या दर्शनास तो गेला. बाबांनी त्याच्या मनातील गोष्टी ओळखून त्याला सांगितले, एक महिन्यात तुझे अंग चांगले होईल आत्महत्त्या करू नको. त्याप्रमाणे सितारामाचे अंग चांगले झाले. बाबांनी त्याला जीवदान दिले.

एकदा पावसाचा दुष्काळ पडला. पाऊस नसल्यामुळे शेतकरी दुःखी झाले. शेतातील पिके वाळून जाऊ लागली. मग गावातील लोकांनी विचार करून ते बाबांचे-कडे गेले. बाबांना विनंती करू लागले तुम्ही महान संत गावात असताना आपल्या गावी पाऊस नाही. बाबांनी सांगितले, संध्याकाळी पाऊस पडेल. लोकांनी हट्ट केला आताच पाऊस पडावयास पाहिजे. पावसाचा हंगाम होता, पण पाऊस पडत नव्हता. मग बाबांनी मेघास विनंती केली. दुपारची वेळ होती, हा हा म्हणता त्या भागात जोराचा पाऊस आला. लोकाना बाबांच्या भक्तीचा मोठाच अनुभव आला.

कृष्णबाबांनी देवाची भक्ति शरीराला दुःख असताना केली. देहाचे दुःख वेगळे करून ते देवाची भक्ति करीत होते. कृष्णबाबा बालब्रम्हचारी होते. त्यांनी शंकराचे तप, विष्णूचे नामस्मरण, ब्रम्हदेवाचे मूर्तीपूजन अशी त्रिवेणी भक्ती त्यांनी केली.

त्यांचे गुरु हरीबाबा, हरीबाबांनी कोयना नदीत लोक पाणी भरण्याच्या नजीक असलेल्या डोहात मासे पाळले होते. तेथे उन्हात कृष्णबाबांनी एक महिना रात्रं-दिवस उपोषण करून तप केले होते.

संत तेथे हरी । हरी तेथे संत । ऐसे चारी वेद बोलती । सांगण्याचा अर्थ असा की, बाबा आपल्या कर्तव्यानी हरीच झाले. शरीरातील आत्मा त्यांनी भक्तीने जागृत केला त्यामुळे त्यांना ब्रह्मज्ञान प्राप्त झाले. इंद्रियावर ताबा ठेऊन त्यांनी इंद्रिये ताब्यात राखली, त्यांचा आहार अर्धी भाकर, थोडासा डाळ भात व भाजी असा असे.

एकदा झोपेत त्यांना देवाने सांगितले की, मुंबई सागरात परशुरामाची मूर्ती मिळेल. मग बाबा मुंबईस नाशिकची गौराबाई हिच्या घरी आले. देवानी दृष्टांतात सांगितल्याप्रमाणे शुभ दिवस पाहून वाळकेश्वर चौपाटीस गेले. सोबत काही भाविक लोक होते. त्यांनी समुद्रात लांबवर पोहोत जाऊन परशुरम मूर्ती आणली. परशुरामाची मूर्ती अडीच फूट उंचीची होती. मग लोकांनी आरती केली. आरती झाल्यावर बाबांनी त्यांच्याबरोबर गेलेल्या लोकांना समु-द्राचे खारे पाणी गोड करून पिण्यास दिले. लोकांना बाबांचे आश्चर्य वाटून

त्यांनी त्याच्या चरणाचे तीर्थ घेतले. परशुरामाची मूर्ती घेऊन बाबा आपल्या गावी गेले- मूर्ती जवळ ठेऊन बाबा भक्ति करू लागले. भाविक लोकांना उपदेश करू लागले. संसारातून मन काढावे । पांडुरंगी मन रंगवावे, तेणे होईल सुखाचा संसार । हरीनामाशिवाय संसारात सुख नाही.

बाबांनी परशुराम मंदीर बांधण्यासाठी विचार चालविला पण बाबांच्या जवळ पैसा नव्हता. मंदिरासाठी पैसा कोण देईल असा विचार करून ते मुंबईस आले. ते आपल्या गावच्या मनुष्याच्या खोलीत राहू लागले. ते परळला रहात होते. बाबांच्याकडे काही धार्मिक व भाविक लोक येऊ लागले. बाबांची किर्ती चोहोकडे झाली. बाबा लोकांना सांगू लागले, आमच्या गावी परशुराम मंदीर बांधावयाचे आहे. यथाशक्ति मदत करावी. बाबांच्या अनुभवाच्या गोष्टी लोकाना कळून आल्या, लोकानी बाबांना परशुराम मंदीर बांधण्यास मदत केली. दादर भागातील काका मास्तर, कर्णिक, मुकुंद चाफेकर यांनी बाबांना फारच मदत केली. मंदीर बांधण्याचे काम पूर्ण होईपर्यंत मुकुंद चाफेकर, आपली नोकरी सांभाळून ते गावचे मंदीराचे काम बघत होते. मंदीर पूर्ण झाल्यावर बाबा मुंबईहून आपल्या गावी गेले. सोबत काका मास्तर, चाफेकर ही मंडळी गेली होती, मग शुभ दिन पाहून परशुरामाची मूर्ती सिंहासनी त्यांनी बसविली.

मुकुंद चाफेकर बाबांना न विचारता परशुरामाची मूर्ती उचलू लागले तेव्हा काय नवल झाले— मूर्तीस घाम आला. तेव्हा काका, मास्तर, चाफेकर घाबरून गेले व बाबांच्या खोलीत जाऊन बाबांना सांगू लागले. तेव्हा बाबा म्हणाले, आमची आज्ञा घेतली नव्हती म्हणून तसे झाले. आता आम्ही आज्ञा देतो. मग बाबांची आज्ञा घेऊन मूर्तीची सिंहासनावर स्थापना केली. त्या दिवशी बाबांनी सर्व लोकांना गोड जेवण देऊन तृप्त केले. अशा तऱ्हेने बाबांचा सहवास भक्ति करण्यात गेला. आपले सर्व आयुष्य देवपणात घालविले. त्यांनी लोकाना पुढील भविष्य सांगितले होते, त्याप्रमाणे लोकाना त्यांच्या गोष्टी कळून आल्या.

सर्व संतांचा विषय नारायण असतो. संत महात्मे मायेच्या वेगळे राहातात. त्यांचा संसार हरीनामाचा असतो. संत सुख दुःखाच्या वेगळे राहातात. त्यांचा एक प्रसंग असा आहे की— बाबांच्या पायी मेरु पर्वतासारखे चिन्ह उमटले त्याच्यामुळे बाबांना त्रास होऊ लागला. मग बाबांनी ऑपरेशन करून पाय काढण्याचे ठरविले. पाय काढण्यास ते वाईस आले. तेथे दवाखान्यात राहिले. ऑपरेशन करण्यास डॉक्टरांना त्यांनी सांगितले. तेव्हा डॉक्टर बाबांना बेशुद्ध होण्याचे इंजेक्शन देऊ लागले. बाबांनी सांगितले असे काही न करता आमचा पाय काढावा. त्याप्रमाणे डॉक्टरांनी बाबांचा पाय कापून काढला, पण त्याचे दुःख बाबांना झाले नाही. सांगण्याचे कारण संत सुखदुःखाच्या वेगळे राहातात हे एक बाबांचे चांगले उदाहरण आहे. दवा-

खान्यात डॉक्टरांनी बाबांची सेवा केली. पाय चांगला झाल्यावर बाबा गावी आले. बाबांना कीर्तन सांगण्याची फार गोडी. रोज त्यांचे घरी कीर्तन असावयाचे.

कीर्तन सांगताना ते एकरुप होत. बाबांना त्रिकाल ज्ञान प्राप्त झाले होते. ते पुढील भविष्य सांगत होते. त्यांनी १९५३ साली किर्तनातून जे भविष्य सांगितले ते खरे होत आहे. पाऊस वेळेवर पडणार नाही. जमिनीमध्ये उत्पन्न कमी निघेल. राजकारणात असंख्य उलथापालथी होतील.

देशादेशामध्ये युद्धे होतील. भूकंपात असंख्य हानी होईल. लोकसंख्येत अनेक पटीने वाढ होऊन लोकाना जीवन अशक्य होऊन बसेल. सोन्याचे शिंग होईल याचा अर्थ असा की, बैलांची किंमत फारच होईल. इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिंदुस्थानाला भेट देऊन जाईल त्याप्रमाणे राणी हिंदुस्थानाला पण भेट देऊन गेली.

कृष्णबाबा निळाचा अवतार होते. त्यांनी चार वेदांचे खंडन केले होते. देवाचे दहा अवतार फिरून पाहिले. अशा तऱ्हेने त्यांनी देवाची सेवा केली. देवाचे आणि संताचे गुण कितीही वर्णन केले तरी ते थोडेच आहेत.

संतांचा उपदेश म्हणजे अमृताचे भोजन आहे. संतांचा उपदेश म्हणजे संसारातून तरुन जाण्याचा मार्ग आहे. संत संग हा जगात श्रेष्ठ मार्ग आहे. संतांच्या संगतीमुळे संसार सुखाचा होतो. त्याचा उद्धारही होतो. असे महात्मे संत परोपकारी असतात. जगाच्या कल्याणा। संताचे विभूती। देह कष्टविती परोपकारा। यासाठी संत अवतार घेत असतात.

कृष्णबाबांची इंद्रिये आणि त्यांचे हातपाय म्हणजे त्यांच्या शरीराला पुण्याईचे घड लोंबत होते, आणि म्हणून संसारातील लोक आपली दुःखे निवारण्यासाठी त्याच्या चरणावर लोळण घेत होती. त्यांचे पाय तिर्थांची खाण होती. त्यांची वाणी उपदेशाची पेठ होती.

अशा तऱ्हेने त्यांनी आपली किर्ती जगामध्ये अजरामर केली.

त्यांनी इंद्रिये जिंकून हरीचे लाल केले. एक लाल सर्व पृथ्वीचे मोल. तेव्हा कृष्णबाबांनी भक्तीने पृथ्वी जिंकून पृथ्वीचे मोल केले.

ते तारीख २५–५–१९५४ बुधवार वैशाख वद्य अष्टमी रोजी समाधी लावून वैकुंठास गेले.

समाधीच्या दिवशी त्या भागातील सर्व स्त्री, पुरुष, मुले बाबांच्या दर्शनासाठी आले होते. स्त्रिया आपली लहान मुले घरी ठेऊन आल्या होत्या. त्यांची लहान मुले घरी शांत राहिली. गाईंना लहान वासरे प्याली नाहीत. अशा तऱ्हेने कृष्णबाबांनी गोकुळातील श्रीकृष्णासारखी अशी लीला केली.

# श्रीमाधवनाथ महाराज

ले. श्री. ना. हुद्दार
समर्थ नगर, कन्नड
जि. औरंगाबाद

● श्रीमच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ, श्रीज्ञाननाथ, सत्या-मेलनाथ, गुप्तनाथ या परंपरेत अलीकडच्या काळात श्रीमाधवनाथ महाराज हेहि होऊन गेले. त्यांचे गादीवर सध्या श्रीमंगलनाथ महाराज हे आहेत. नाथसांप्रदा-याच्या अनेक शाखा होऊन त्यांचा सर्व भारतात विस्तार झाला. त्यापैकी एका शाखेतील 'श्रीगुप्तनाथ' ही पूर्वाश्रमीची गंगाबाई नावाची महिला होती. नाथ-दीक्षा घेऊन ती पुढे योगिनी झाली. चित्रकूटजवळ करवी येथील श्रीबालाजी मंदिराचे तळघरात हिची समाधि असून ह्याच गादीवर श्रीमाधवनाथांना बसविण्यात आले होते.

महात्मे व साधुसंत यांची जीवनचरित्रे समुद्रावरील दीपस्तंभाप्रमाणे संसार-सागर तरुन जाण्यास सर्वसाधारण लोकांना मार्गदर्शक होत असतात. तेव्हा श्रीमाधवनाथ महाराजांच्या चरित्राच्या पठण–मनननेहि चित्तशुद्ध होऊन त्याला सात्विक आनंद होईल यात संदेह नाही.

## जन्म व बालपण

श्रीमाधवनाथांचे घराणे मूळ पांगरी जि. नाशिक येथील होय. पण पुढे मराठवाड्यातील रंगाऱ्याचे देवगावी जि. लासुर (रेल्वे स्टेशन, औरंगाबाद) त्यांचे स्थानांतर झाले. त्यांचे उपनाव 'रत्नपारखी' असून श्री. मल्हारदादा व सौ. मथुरा-बाई हे त्यांचे पिता-माता होत. यांचा आचार धर्मनिष्ठ असून श्री. यशवंतराव महाराज देवमामलेदार यांची त्यांचेवर कृपा होती. त्यांनी सौ. मथुराबाईंना सांगि-तले होते की, तुझ्या पोटी योगी पुरुष जन्म घेईल.' हे दांपत्य काशी प्रयागच्या यात्रेवर असता चित्रकूटजवळ करवी गावी आले. तेथे मल्हारदादाचे चुलतभाऊ बाळकृष्णपंत राहत असत. यावेळी सौ. मथुराबाई गरोदर असून त्यांचे दिवस भरत आल्याने त्यांना तेथेच मुक्काम करावा लागला.

यावेळी योगिनी गुप्तनाथच्या गादीवर श्रीविठ्ठलनाथ हे योगी पुरुष होते. चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १७७९ (दि. २९ मार्च १८५७) दिनी सूर्योदयापूर्वी मथुराबाई स्नान करून तुळशी प्रदक्षिणा करू लागल्या इतक्यात त्यांना प्रसूति वेदना सुरू होऊन सूर्योदयकाली नवबालकाचा जन्म झाला. बाराव्या दिवशी आनंदोत्सवपूर्वक या बालकाचे नाव माधव ठेवण्यात आले.

पुढे मल्हारदादा पत्नी व मुलांसह पांगरी येथे आले. माधव ५ वर्षांचा असता मल्हारदादांचे निधन झाले. मथुराबाईंनी फार शोक केला. तेव्हा लहानग्या माधवने यांच्या मांडीवर बसून आपली दृष्टि मातेच्या डोळ्यावर स्थिर केली आणि तिला आत्म्याच्या अमरत्वाची जाणीव झाली व तिचे दुःख कमी झाले.

लहानपणापासून माधव आपल्या विलक्षण बुद्धिप्रभावाने सर्वांना दिपवू लागला होता. लवकरच त्याला शाळेत घालण्यात आले. पण त्याचे लक्ष शिक्षणाकडे नसे. शाळेचे निमित्त करून तो गावाबाहेरच्या महादेवाच्या मंदिरात ध्यान करीत बसे किंवा सोबत्यासह भजन पूजन करण्यात दंग होऊन जाई. पण शाळेत जाई तेव्हा कोणत्याहि विषयात इतर मुलांपेक्षा बुद्धीची विशेष चमक दाखवी.

८ व्या वर्षी त्याचा व्रतबंध करण्यात आला. संध्या,ब्रह्मकर्म यात थोडयाच कालात त्याने प्राविण्य संपादन केले होते. शाळेकडे माधवचे दुर्लक्ष असल्याचे पाहून मथुराबाईंना फार काळजी वाटे. सटाणे येथे यावेळी यशवंतराव महाराजदेव-मामलेदार होते. त्यांच्या भेटीला त्या मुलासह गेल्या. त्यांनी सांगितले, 'तुझा मुलगा मार्गावर आहे, काही काळजी करू नको. मात्र त्याला लवकर करवीस घेऊन जावे.' याच सुमारास करवीहून बाळकृष्णपंतांचे माधवला घेऊन येण्यासंबंधी पत्र त्यांस आले होते. वर्षप्रतिपदेच्या सुमारास मथुराबाई करवी येथे गेल्या. यावेळी माधव केवळ १० वर्षांचा होता.

## श्रीगुप्तनाथांच्या गादीचे वारसदार

विठ्ठलराव महाराजानंतर श्री. विश्वनाथराव महाराज हे गृहस्थाश्रमी गृहस्थ या नाथगादीवर होते. विश्वनाथ महाराजांचे याचवेळी निधन झाल्याने गादीवर कोणास बसवावे असा प्रश्न उपस्थित झाला. पाच मुलांची नावे कागदावर लिहून त्या चिठ्या नाथांच्या समाधिपुढे ठेवण्यात आल्यावर त्यापैकी एक चिठ्ठी उचलली असता ती माधवच्या नावाची निघाली. तेव्हा अभिषेक करून विधीनुसार माधवला गादी-वर बसविण्यात आले व त्याचे नाव 'माधवनाथ' ठेवण्यात आले.

अनुग्रह-दीक्षेसाठी माधवनाथांना शैलीशृंगीने विभूषित करून तळघरातील गुप्तनाथांच्या समाधिजवळ बसविण्यात आले व दार बंद करण्यात आले. काही तासानंतर 'अलख' हा नाथ सांप्रदायाचा संकेतिक शब्द आतून ऐकू आला तेव्हा दार उघडण्यात आले. या गुहेत त्यांना गुप्तनाथांचा अनुग्रह झाला व नवनाथांची गूढ योगशक्ति संपादन करूनच ते बाहेर आले. याचा त्यांच्या आचारविचारावर विशेष परिणाम होऊन ते विदेही स्थितीत राहू लागले .

काही दिवसानी माधवनाथांना विश्वनाथ महाराजांचे कुटुंब ठकूबाई यांच्या स्वाधीन करून मथुराबाई आपल्या गावी परत गेल्या. योग माधवनाथांची विदेही स्थितीतील वागणूक पाहून ठकूबाई व इतरांस फार चिंता वाटू लागली. तेव्हा त्यांचे लग्न करून द्यावे असा विचार करण्यात आला. माधवनाथांच्या हे तेव्हाच लक्षात आले तेव्हा ते एका दिवशी गुपचुप करवीहून बाहेर निघून गेले.

## तपःसाधना व तीर्थयात्रा

यानंतर एक वर्षाचा काळ त्यांनी तीर्थाटन व तपश्चर्या करण्यात घालविला. १३–१४ वर्षाच्या माधवनाथांनी बद्रीकेदार ते रामेश्वरपर्यंत आणि बंगालातील हेलारा पट्टनापासून गुजराथेतील गिरनार पर्वतापर्यंत तीर्थयात्रा केल्या. या कालात त्यांनी नवनाथांची तीर्थस्थाने, सर्व ज्योतिर्लिंगे व सहापुऱ्या पाहिल्या. हिमालयात ६ वर्षे तपश्चर्या करून एकमेवा द्वितीयकम् तत्वाची प्रचीति घेऊन ते करवीला परत आले. या काळातील त्यांच्या साधनावस्थेची तपशीलवार माहिती मात्र उपलब्ध नाही.

करवीला आल्यावर माधवनाथांनी गादीचा व्यवहार आपल्या वृत्तीनुसार पाहण्यास आरंभ केला. दानधर्म, यज्ञ कार्ये होऊ लागली व त्यात बराच पैसा खर्च होऊ लागला. सखारामबापू यावेळी बालाजी संस्थानचे कारभारी होते. या संधीचा फायदा घेऊन बापूनी बऱ्याच द्रव्याचा अपहार केला व देवाचे दागिनेहि गहाण ठेवले. भाऊसाहेब जोग आदि नाथांच्या भक्तजणांना सखाराम बापूंच्या कृष्ण-कृत्याची माहिती लागली व त्यांनी नाथांना वारंवार जमाखर्च पाहण्याची विनंती केली. पण विरक्त वृत्तीमुळे त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. एके दिवशी त्यांचे समोर खर्चाच्या वह्या ठेवण्यात आल्या तेव्हा हा सर्व प्रकार उघडकीस आला. सखाराम बापूही घाबरले व त्यांनी नाथांच्या पायावर डोके ठेवून क्षमायाचना केली. श्री. जोगाचें म्हणणे की सखारामबापूवर दावा करावा पण माधवनाथ शरणांगताला कसे दूर करणार ?

## करवीहून पुनः प्रयाण

दुष्टप्रवृत्त सखारामबापूनी मात्र यानंतरहि पुनः कारस्थाने करून नाथांबद्दल ठकूबाईंचे मन कलुषित केले. त्याहि नाथांच्या खर्चिकपणामुळे नाराज झाल्या व त्यांनी नाथांना करवीबाहेर जाण्यास सांगितले. नाथांनी पडत्या फळाची आज्ञा स्वीकारून करवी सोडण्याचे ठरविले. परंतु नाथांच्या भक्तगणाला हे न रुचून 'आपण नवीन मंदिर बांधू, आपण येथेच राहावे,' अशी कळकळीची विनंती केली. भक्तांचे प्रेम की मातृ आज्ञा पालनाचे कर्तव्य असा पेच त्यांचे समोर पडला. कर्तव्यास अधिक महत्व देऊन त्यांनी सर्वांस उपदेश केला, 'नाशवंत कलेवराची आसक्ति सोडा. ईश्वरी स्वरुपाची कास धरा. तुम्ही स्मरण कराल तेव्हा मी भेटेन' असा विश्वास दिला. ही घटना शके १८१२ सन १८९० मधील आहे.

## अज्ञातवासातील काळ

यावेळी नाथांचे वय ३३ वर्षांचे होते. यानंतर ५–६ वर्षे स्वैर पर्यटन करण्यात अज्ञातवासात त्यांनी घालविली. भक्तोद्धाराचे कार्य मात्र चालू होते. त्यांच्या भक्तगणात राजेरजवाड्यापासून रंकापर्यंत, शिक्षित, अशिक्षित, हिंदू–मुसलमान–खिस्ती, अशा विविध लोकांचा समावेश होतो. श्रीमाधवनाथ काशीस गेले व तेथे अनेकांना अनुग्रहित केले. तेथून अमरकंटकला आले. तेथे २ वर्षें अरण्यवासात घालविली. नंतर इंदूर येथे यशवंतरावमहाराज देवमामलेदार होते त्यांच्या दर्शनास गेले. इंदूरचे राजे श्रीमंत तुकोजीराव होळकर यांचेकडे त्यांचा मुक्काम होता. श्रीनाथ महाद्वारापाशी पोचले तोच देवमामलेदारहि त्यांच्या स्वागतासाठी महाद्वारी आले व दोघे कडकडून भेटले. श्रीदेवमहाराजांनी श्रीनाथांना हाताने धरून त्यांना आपल्या निवासस्थानी नेले. श्रीतुकोजीरावांचा श्रीनाथांशी परिचय करून दिला व पुढे सर्व राजघराणेच माधवनाथांचे भक्त बनले. तेथून ते महू व धारला गेले. धारला विभूती देऊन काहींचे रोगनिवारण केले. हा चमत्कार पाहून धारचे इंग्रज डॉक्टर 'कीगन' यांची श्रीनाथांवर श्रद्धा बसली. नाथांनी त्यांना हातावर हात घासून त्याकडे पाहण्यास सांगितले तर हातावर दिव्य प्रतिमा दिसली. हीच साधना करण्यास त्यांनी त्यास सांगितले.

## शेत राखणदाराचे काम

यानंतर श्रीनाथ खांडवा चाळीसगावकडे गेले. पोहरे गावी 'धोंड्या' नाव धारण करून एका पाटलाकडे शेतराखणीचे काम करू लागले. पोटापुरते पाटलाने

दूध द्यावे असे ठरले. एक दिवस श्रीनाथ भजनात रंगले असता बैलाने शेतात शिरून गव्हाचे पीक नासवले. यामुळे पाटलीणबाईंना राग येऊन त्यांनी नाथांना खूप शिव्या दिल्या. नाथ शांतच राहिले. काम सोडून जाताना त्यांनी बाईस सांगितले की, 'तुला ५२ मण गहू होतील' पुढे खरेच इतके पीक झाले. तेव्हा पाटलाना फार पश्चात्ताप वाटला.

येसगाव येथे संगळ व नगारा वाजवून सुंदर भजने श्रीनाथांनी केली रोझे-गाव येथे भिकंशाह संत जर्जरीबक्षच्या उरुसाकरिता आले होते. त्यांची नाथांची भेट झाली. दोघांनी मिळून पुराणातील कलमांचे पठण केले. तेथून नाथ वेरूरला गेले व तेथील राममंदिरात त्यांनी काही सुंदर चित्रे काढली. ती अजून पाहता येतात.

येथे चतुर्थाश्रमी श्रीचिद्‌धनानंद स्वामीशी त्यांची भेट झाली. त्यांनी नाथांना सांगितले, 'तुझी आई तुझी आठवण काढीत शोक करीत आहे. तिला जाऊन भेट व अज्ञातवास संपवून लोकोद्धाराचे कार्य कर! नाशिकजवळच्या सप्तशृंगीजवळच्या वनात काही दिवस राहून माधवनाथ देवगाव येथे जन्मदात्या मथुराबाईच्या भेटीस गेले. अनेक वर्षांनंतर माता-पुत्रांची ही भेट झाल्याने मातेला फार आनंद झाला. 'आता मला सोडा दूर जाऊ नकोस, असे मातेने सांगितले. मातेचा अंतकाल समीप आला हे जाणून नाथांनी हे मान्य केले. सहा महिन्यात तिचे निधन झाले. शेवटच्या दिवशी मातेचे डोके मांडीवर घेऊन नाथांनी समाधि लावली व नंतर तिचे प्राणो-त्क्रमण झाले. योगी पुत्राच्या सान्निध्यात मरणाचे भाग्य त्या मातेला लाभले.

## लोकोद्धाराचे कार्य

इ. स. १८९६ म्हणजे वयाच्या ३८ व्या वर्षापासून श्री. माधवरावांनी प्रगट-पणे धर्मप्रसाराचे व लोकोद्धाराचे कार्य सुरू केले. या काळात जयपूर, चित्रकूट, काशी, नागपूर, खानदेश, मुंबई, पुणे, कारवारपर्यंत संचार करून भाविक जनतेवर मार्गदर्शन केले.

चित्तशुद्धिपासून आरंभ करून प्रत्येकाला त्याच्या पात्रतेनुसार जप व योगादि साधनांचा ते उपदेश करीत. गंगामाई जशी चांगला-वाईट असा भेद न करता सर्वांस जवळ करते तद्वत नाथहि त्यांचेकडे येईल त्याला आत्मोद्धाराची प्रेरणा करीत. त्यांच्या शिष्याची संख्या अगणित असून काही शिष्यांना तर जीवनकालातच त्यांनी पूर्णत्वाला पोचविले.

## श्रीनाथांची उपदेश प्रणाली

योगाच्या कष्टसाध्य मार्गापेक्षा सर्वसाधारण लोकांना ते सुलभ भक्तिमार्गाचाच उपदेश करीत व या भयरहित निश्चित साधनाने आत्मोन्नति करण्यास सांगत. ईश्वरी शक्तीवरील श्रद्धा वाढविण्यासाठी व भक्तांचे दुःख व राग निवारण्यासाठी त्यांनी अनेक चमत्कार दाखविले. व्याख्याने, प्रवचने यापेक्षा बैठकीत चर्चा, संवाद शंका समाधानाचा मार्ग स्वीकारणे व शरण येईल त्याला त्याच्या पात्रतेनुसार भक्ति व उपासनेचा मार्ग दाखवून त्याला परमार्थ प्रवण करणे ही त्यांची कार्यप्रणाली होती.

सर्व प्रगतीचे मूळ चित्तशुद्धि, श्रद्धा व प्रयत्न सातत्य या त्रयीमध्ये आहे. शुद्धिविना मोहपाश सुटत नाहीत. श्रद्धेविना शेवटपर्यंत टिकाव धरता येत नाही व सतत प्रयत्नाशिवाय यशसिद्धि नाही. या त्रयीवर श्रीमाधवनाथ भर देत. भक्तांमध्ये सकाम व निष्काम असे दोन वर्ग पडतात. सकाम उपासनेतून श्रद्धा निर्माण होऊन मानवाची भक्तिमार्गाकडे प्रगति होऊ शकते.

भक्तियोग, कर्मयोग, राजयोग व ज्ञानयोग या सर्वांचा चार मार्गापैकी भक्त कोणत्याही मार्गाने जाणारा असो. भक्ति आधार आहेच कर्मयोग्याला कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करावी लागत असल्याने भक्ति हा त्यांचा आधार असतो. राजयोगात प्राणांतिक कष्ट करण्याची तयारी ईश्वराच्या आंतरिक ओढीमुळे म्हणजे भक्तिमुळेच शक्य होऊ शकते. ज्ञानमार्गांतहि चिंतनाचा विषय ईश्वरच असल्याने येथेहि भक्ति आवश्यक ठरते.

एकूण भक्ति सर्व मार्गांना आधारभूत असते. आत्मोन्नतीस आवश्यक ईश्वरी साहाय्यता मिळवून न देणारा भक्ति हाच मार्ग भयरहित व निश्चित स्वरुपाचा आहे. म्हणून श्रीमाधवनाथ सर्वसाधारण लोकांना भजन-पूजनादि भक्तिमार्गाचा अवलंब करावयास लावून ईश्वराभिमुख करीत. विशेष पात्रता असल्यास मात्र मुद्रा, आसने, प्राणायामादि योगक्रियांचे क्रमाक्रमाने शिक्षण देत. मच्छिंद्र गोरक्ष प्रणीत नवनाथ. संप्रदायाचा 'राजयोग' श्रीनाथांनी चांगल्या प्रकारे साध्य केला होता व त्यांच्या भक्त परिवारात काही शिष्यांनी राजयोगामध्ये चांगलीच प्रगति केली होती.

श्रीमाधवनाथ महाराज संचार करीत फरीत हिंगणघाट (जि. वर्धा) येथे आले असता शके १८५६ (सन १९३६) मध्ये त्यांचे निर्वाण घडून आले. इंदूरच्या भक्तांच्या आग्रहाने त्यांचे कलेवर मोटरीने तातडीने इंदूरास नेऊन तेथे मोठ्या थाटामाटाने व शास्त्रोक्त रीतीने समाधीचे कार्य संपन्न करण्यात आले. या स्थानी भव्य नाथमंदिर बांधण्यात आले असून हे भाविकांचे व श्रीनाथशिष्यांचे पवित्र क्षेत्र बनले आहे.

*

# श्रीसाईबाबांविषयी एक अनुभव

—सौ. अनिता दुबेद्वार
४२–२६ साउथ टी. टी. नगर
भोपाळ (म. प्र.)

● ही गोष्ट सन १९७४ सालाची आहे. पहिल्यांदाच गर्भवती असताना मला फारच त्रास झाला. ईश्वराचे नाव घेत घेत मी नऊ महिने काढले. १२ नोव्हेंबर रोजी मी प्रसूत होऊन मला कन्या रत्न झाले हे ऐकून सर्वानाच खूप आनंद झाला. सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला. कारण माझी प्रकृति खूपच खराब झाली होती. परंतु प्रसूति जरी सुखाने झाली होती तरी पण काळाने आपली किमया दाखवलीच.

बाराव्या दिवशी घरी आणल्यावर आंघोळ वगैरे घातली व मला झोप लागली. त्याच दिवशी दुपारी एकाएकी मी बेशुद्ध झाले व माझी दातखिळी बसली. थोडा वेळ हे कुणालाच कळले नाही. सर्वांना मी झोपली आहे असेच वाटले. परंतु जेव्हा मी जेवायला वगैरे पण उठली नाही तेव्हा सर्वांनी उठवून पाहिले. अशा परिस्थितीत आठ दिवस माझ्या पोटात अन्नपाणी जाईना व मी कुणालाच ओळखेना. तेव्हा माझ्या वडिलांना तार करून बोलावण्यात आले. ते पण सर्व परिस्थिती पाहून खूपच घाबरले. कारण दोन दिवस आधीच ते मला चांगली सुदृढ पाहून गेले होते.

घरच्या मंडळींनी मोठे मोठे डॉक्टर, वैद्य आणले परंतु कुणाचेच औषध लागू पडेना व सर्वांनी एकच निदान केले की ह्यांना शारीरिक काहीच रोग नाही. घरगुती पण सर्व उपाय केले. अंगारे, दोरे वगैरे केले. मोठे मोठे मांत्रिक पण आणले परंतु कशानेच फायदा होईना व दिवसेदिवस प्रकृति बिघडतच गेली. डॉक्टरानी तर माझ्या वडिलांना सांगितले की, आता आमचे मानवी यत्न असफल झाले आहेत. तेव्हा ह्यांचा भार आता देवावरच घालावा तोच ह्यांना ह्या संकटातून सोडवू शकेल हे ऐकून सर्वानाच खूप वाईट वाटले. माझे वडील हे ऐकून उद्विग्न अवस्थेत इकडून तिकडे फिरत होते. विचार करता करता त्यांचा त्यांनी हात सहज आपल्या खिशात घातला. खिशामध्ये पैशाचे पाकिट होते. ते त्यांनी उघडले व त्यात त्यांना

श्रीसाईबाबांचे सुन्दर चित्र दिसले ! त्या चित्रास पाहताक्षणी ते डोळयात अश्रु आणून म्हणाले, " हे देवा, दीन दयाळा तू आपल्या भक्ता करिता कुठेहि धावून जातोस व त्यांना संकटातून सोडवतोस. कृतांताच्या दाढेतून काढण्याचे तुझ्यात सामर्थ्य आहे. तेव्हा माझ्या ह्या मरणासन्न स्त्रीवर कृपादृष्टि कर व धावून ये मी आजन्म तुझी सेवा करीन व तुझा ऋणी राहीन."

त्यांची करुण आर्त हाक ऐकून शिर्डीचा देव धावून आला व कृतान्तकाळाला त्याने मागे परतवले. प्रार्थनेनी आपली किमया दाखविली. हळुहळू प्रकृतीत फरक पडू लागला. आशेची किरणे दिसू लागली. वडिलांच्या डोळयात आनन्दाश्रु आले व त्यांनी साईबाबांचे अनन्त उपकार मानले हे पाहून सर्वांनाच आनन्द झाला.

त्याच दिवशी माझ्या सासऱ्यांना एका व्यक्तीचे नाव कळले होते. ते ह्या रोगावर नामांकित डॉक्टर होते. इंदूरच्याजवळ कस्तुरबा ग्राम गाव आहे. तिथून ते आले व त्यांनी मला तपासून त्यांना वातविकार झाला असे निदान केले व इंजेक्शन व पोटात औषध दिले. जी दातखिळी आठ दिवस बंद होती ती आपोआप त्या दिवशी उघडली. सर्व औषध पोटात गेले व १५ दिवसात मी पूर्ववत झाले. त्या दिवशी डॉक्टरांच्या रूपात जणु साईबाबाच आमच्या घरी आले व माझे प्राण वाचवले. त्यानंतर आम्ही सर्वजण शिर्डीस गेलो व श्रीसाईबाबांचे दर्शन केले. त्यानंतर आमच्या तब्बेती अगदी उत्तम आहेत. त्यांच्या कृपेचे बरेच अनुभव आम्हाला आले आहेत. त्यांच्या कृपेच्या छत्राखाली आम्ही सुखाने संसार करीत आहोत. *


# श्रीसाईलीला

**सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७७**

श्रीसाई भक्तांना आलेल्या. बाबांच्या विषयींच्या विविध अनुभवांनी भरगच्च असा अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

श्रीसाईभक्तांनी आपापले अनुभव कागदाच्या एकाच बाजूवर सुवाच्य लिहून ते २० सप्टेंबर ७७ पर्यंत संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर पाठवावेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकुराचा स्वीकार करता येणार नाही.

**मुखपृष्ठावर बाबांचे उत्कृष्ट चित्र किंमत सव्वा रुपया**

# प्रदक्षणा

● श्री. शंकर इनामदार
टी ६/१ मंडाले लाईन्स,
रेंज हिल्स्, खडकी,
पुणे ४११०२०

● त्यागाची परिसीमा म्हणजे कुर्वंडी. पंचारतीच्या ओवाळणीत कुर्वंडीची भावनाच अभिप्रेत आहे. पंचारतीच्या पाच ज्योती पंचप्राणांच्या प्रतीकच असतात. पंच प्राणाहूनही प्रिय असलेल्या दैवतावरून अगर व्यक्तीवरून ते प्राण ओवाळून टाकण्याची सिद्धता त्या पंचारतीच्या ओवाळणीनं प्रदर्शित होते.

पण तेवढ्यानंही मनाचं समाधान होत नाही. मनाला वाटत असतं– पांच ज्योतीच्या द्वारे होणारी ही प्रतीकात्मक क्रिया कशाला ? ज्यात हे पंचप्राण साठवलेले आहेत तो संपूर्ण देहच का ओवाळून टाकू नये ? पण स्वतःच्या पंचप्राणयुक्त हा देह स्वतःच कसा ओवाळून टाकावा ? पंचप्राणांची ही कुर्वंडी करावी कशी ? पंचारतीसारखा हा देह अधांतरी फिरवता– ओवाळून टाकता येईल ? मग हे कसं साधावं ?

अधांतरी ओवाळता आला नाही तरी समांतर राहून ही कुर्वंडी करता येते. अशा प्रकारची पंचप्राणांची कुर्वंडी म्हणजेच प्रदक्षणा. आराध्य दैवताभोवती घातलेल्या प्रदक्षणा म्हणजे त्या दैवतावरून स्वदेह ओवाळून टाकण्याची क्रिया. स्वदेहाची कुर्वंडी. स्वदेहात समाविष्ट असलेल्या पंचप्राणांची ओवाळणी. प्रत्येक प्राण ज्योतिर्मय. ज्योतिरूप. पाच ज्योतीची पंचारती अशा प्रकारे प्रदक्षणेत अभिप्रेत आहे.

साई माझी माता – साई माझा ताता
साई भगवंत – सद्‌गुरू माझा.

सद्‌गुरू सेवेला – सिद्ध पंचप्राण
सारे देहभान – विसरून.

पांचही प्राणांच्या –ज्योती तेजाळून
टाकूं ओंवाळून –पूर्ण देह.

—पूर्ण देह ओवाळून टाकायचा म्हणजे प्रदक्षणा घालायच्या. अशासाठी की त्या देहाची आसक्तीचि राहू नये. सुख, दुःख, चिंता, संकट भय या गोष्टींची मग क्षितीच नाही. ज्या देहाला या व्याधी जडणार तो देहच संपूर्णतया सद्‌गुरूला अर्पण करायचा. ती ओवाळणी, ती कुर्वंडी, ती प्रदक्षणा घालीत म्हणायचं—

धन्यधन्य ही प्रदक्षणा सद्‌गुरू साईंची,
झालो कृतार्थ आतां मुळीं न चिंता जन्मा-मरणाची ॥ धृ ॥

अपार त्या विघ्नांच्या –
आल्या जरि राशीं,
असतां सद्‌गुरु पाठीशीं –
जरूर ना मुळी आम्हा –भयभित होण्याची ॥ १ ॥

सद्‌गुरूच्या स्मरणाने – झाला आनंद
मंगल त्या भेटीचा – लागला छंद
कृपा प्रभो, नित्य असो – भक्तांवर तुमची ॥ २ ॥

...............

‘ मुलांचे साईबाबा ’
या मराठी गोष्टीरूप पुस्तकाचा हिंदी अनुवाद
‘ बच्चोंके साईबाबा ’
मूळ मराठी लेखक : कै. प्रा. द. दि. परचुरे
हिंदी अनुवाद : सदानंद चेंदवणकर का. संपादक श्रीसाईलीला

# बाबांच्या उदीचा चमत्कार

● श्री. अरुण निमळ,
१३७/११, रेंजहिल्स, खडकी

● आम्ही लहानपणापासून साईबाबांची पूजा करीत आहोत. दर गुरुवारी सामुदायिक आरती करतो. विशेष म्हणजे आमची आई साईबाबांची भक्ती फार कडक करते. त्यांच्या सेवेमुळे आतापर्यंत आम्हाला कोणत्या प्रकारची कमी पडू दिली नाही आणि पुढे असेच बाबांचे आमच्यावर उपकार असावेत, अशी आम्ही त्यांना मनापासून प्रार्थना करतो.

दिनांक २९–१२–१९७५ रोजी आमच्या येथे दोन लग्ने झाली. त्यादिवशी अंदाजे ५०० लोकांची जेवणाची सोय आम्ही केली होती. परंतु प्रत्यक्षात आमंत्रित मंडळी पाहून आमचे धाबे दणाणले. क्षणाचाही विलंब न करीता आम्ही आचाऱ्याला जेवण होईपर्यंत थांबण्यास सांगितले. बाबांच्या रूपाने त्यानेही होकार दिला आणि शेवटपर्यंत तो थांबला. त्या दिवशी अंदाजे ८०० ते ९०० लोकांची जेवणं झाली. आमची अब्रू वाचविल्याबद्दल सारखे आम्ही बाबांचे आभार मानीत होतो.

दुसऱ्या दिवशी ३०–१२–७५ सकाळी मोठ्या पातेल्यात मसालेभात केलेला होता. ते पातेले आमच्या काकूने भात काढण्यासाठी उचलले. त्याचक्षणी त्या पातेल्याच्या खाली बाबांच्या पादुका सापडल्या. त्या पाहिल्यानंतर आईने सांगितले– अरे, ह्या तर देव्हाऱ्यातील पादुका आहेत. ताबडतोब देव्हाऱ्यात पाहिले तिथें पादुका नव्हत्या. काय प्रकार आहे कुणाच्याच लक्षात आला नाही. घरात सगळ्यांना विचारून झाले की, बाबांच्या पादुका देव्हाऱ्यातून कुणी काढल्यात का ? प्रत्येकांनी नाही असेच उत्तर दिले. काय, गोंधळ चाललाय म्हणून वडिलांनी विचारले ! सगळी बातमी कळल्यानंतर वडीलांनी सांगितले की, ज्यावेळेस आचारी स्वयंपाक करीत होता. तेव्हा मी मसालेभातात बाबांची उदी टाकली. त्यांचा हा सगळा चमत्कार आहे, हे ऐकल्यावर आम्हाला सगळ्यांना आश्चर्य वाटले. भात खूप उरला होता. नंतर तीन दिवस सतत आम्ही भात खात होतो.

तातपर्य असे आहे की, जो कोणी साईबाबांची मनोभावे सेवा करील त्याची सेवा वायफळ जाणार नाही. संकटामध्ये त्याचा नक्की उपयोगच होईल. याचा इतर भक्तांनी पडताळा घ्यावा,

*

# बाबांचे नामस्मरण केले नि पाय दुखणे थांबले

-श्री. रमेश किनारे
दादर, मुंबई २८.

* बरेच दिवस साईलीला मासिकामधील साईभक्तांचे विविध अनुभव वाचल्या-नंतर मलासुद्धा अनुभव लिहावा असे फार वाटायचे. आता मी जो तुम्हाला अनुभव सांगणार आहे तो सर्वांपेक्षा अगदी वेगळा आहे.

तो दिवस म्हणजे ३० जून ७७ गुरुवार होता. आणि मी त्या दिवशी गुरु पौर्णिमेच्या उत्सवानिमित्त शिर्डीस गेलो होतो. मुंबईहून निघण्यापूर्वी अगोदर एक दिवस माझ्या पायांना नवीन बूट लागले होते, आणि त्यातच पायावर शिलाईमशीन आदळली होती. शिर्डीला गेल्यानंतर माझे पाय जास्तच दुखू लागले, आणि पायांना सूज चढली. मित्रांच्या आग्रहाने डॉक्टरकडे गेलो. डॉक्टरानी सांगितले सेपटीक झाले आहे. त्यासाठी इंजेक्शन आणि गोळ्या घ्याव्या लागतील. मी इंजेक्शन आणि गोळ्या घेतल्या. नंतर समाधी मंदिरात जाऊन लंगडतच बाबांना म्हणालो, (अर्थात् मनात) दोन तासानंतर पालखी निघणार आहे. मला पालखीबरोबर नाच-ण्याची फार इच्छा आहे. माझा पाय व्यवस्थित होऊ द्या. समाधीमंदिरातून बाहेर पडलो. रात्री पालखीची मिरवणूक गावातून निघणार होती, आणि मी पाय दुखतो आहे म्हणत बसलो होतो. रात्री ठीक ९ वाजता पालखीची मिरवणूक नेहमीप्रमाणे आनंदात निघाली. सर्व लहानथोर मंडळी आपापल्या नादात बाबांच्या पालखीपुढे नाचत होती. मी नकळत त्या नाचणाऱ्या मंडळीमध्ये मिसळलो; आणि पायाना बँडेज आहे. पाय सुजला आहे. हे विसरून मी सुद्धा त्या आनंदात नाचलो. इतका नाचलो इतका नाचलो की, मिरवणुकीच्या शेवटी मला त्या दुखणाऱ्या पायाची एकदम आठवण झाली. माझ्या पायांचे बँडेज धुळीत मिसळले होते आणि माझे पाय दुखायचे अजिबात थांबले होते, आणि बाबांच्या सानिध्यात मी कसा नाचलो ते माझे मलाच कळले नाही. पुन्हा एकदा मी बाबांचे मनातल्या मनात पुण्यस्मरण केले, आणि म्हणालो, बाबांची लीला कितीही वर्णिली तरी थोडीच आहे.

...............

# वाऱ्यावरचे विचार

● श्री. द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज, गोखले रोड,
ठाणे (पश्चिम)

## २१ खड्डा

● खड्डा सर्वांच्या ओळखीचा आहे, ही ओळख नागरिकांनी विसरू नये म्हणून नगरपालिका सदैव प्रयत्नशील असते. खाचखळगे, चर, गटार ही खड्ड्याचीच लहान मोठी भावंडे आहेत. सर्वात लहान खळगा, म्हणून लहानपणीच काजू वा गोट्या खेळताना त्याची ओळख होते, गटार तरी म्हणजे काय ? खड्डाच. खूप लांब व त्या मानाने कमी रुंद. अगदीच कमी लांब व अरुंद म्हणजे चर. खड्डा ही एक क्षुल्लक बाब असे आपण समजतो खरं पण पुष्कळ वेळा परिणामी तो घातूक असतो पाणी खात्याने खणलेल्या खड्ड्यात चुकून पडल्यामुळे तोंडचे पाणी पळवणारे गंभीर अपघात घडतात. अशावेळी आपण खड्ड्याचा तिरस्कार करतो. पण तो तसा नाही, खड्डा खरोखर उपयुक्त आहे. मानवनिर्मीत वनस्पती खड्ड्यातून जन्मास येते. माळी प्रथम खड्डे करतो मग त्यातून वृक्ष जन्मास येतो. लहान मोठ्या सर्व इमारती, पूल खड्ड्यातूनच वर आल्या आहेत. पृथ्वीवर मोठ मोठे खड्डे होतात तेव्हा सरोवरं व तळी होतात. पूर्वीच्या कोकणाच्या किनाऱ्याचा काही भाग खचला म्हणजे खड्डा झाला. तेव्हा हिंदीमहासागर तयार झाला असं म्हणतात. जमीन सदैव सगळीकडे सारखी सपाट असती तर मानव जीवनास मुकला असता. खड्डा स्वच्छतेला उपयुक्त व मानवी जीवनास पोषक आहे, आपण कचरा व घाणघुण खड्ड्यात टाकतो व करतोही. असे खड्डे मातीने बुजविले तर चांगले खत मिळू शकते. या खतावर वनस्पती चांगली धष्टपुष्ट होते. गटारामुळे (वर पहा) सांडपाण्याचा निचरा होतो. तसं न झालं तर आरोग्य धोक्यात येईल. खड्ड्यातील पाण्यामुळे डास फैलावतात. त्यामुळे डॉक्टराचे नशीब फळफळावते, जीवनात माणूस कित्येक वेळा खड्ड्यात पडतो. यामुळे धडा शिकून पुन्हा त्या वाटेने जात नाही, जगातील बहुसंख्य लोक आधी खड्ड्यात जातात व तेथून मग स्वर्गात जातात. त्यांचा स्वर्गाचा मार्ग खड्ड्यातून जातो. काही लोक अग्निदिव्य करून स्वर्गात जातात. हे खरं पण त्यांचे अंती उरलेले अवषेश खड्ड्यातच जातात. जमीनीवरील खड्डे उपयुक्त असले तरी काही

धोक्याचेही असतात, असे खड्डे आपण मनात आणलं तर बुजवून आपला मार्ग बिनधोक करू शकतो. पण जीवनपथावरील खड्डे भयंकर असतात. ते जीवंतपणी मरण भोगायला लावतात. कामक्रोधादी कामकऱ्यांनी जीवनमार्गात केलेल्या नाना विषयांच्या खड्ड्यात माणूस पडला तर चिखलात रुतलेल्या माणसाप्रमाणे तो खाली खाली, खोल खोल जात जात शेवटी पाताळात नरकात जातो. अशांची संगत नको रे बाप्पा. हे खड्डे टाळून माणसाने पुढे पुढे गेले पाहिजे. अशा खड्ड्यात पडलेल्याला वर काढणारा एक सद्गुरुच आहे. म्हणून त्याच्या सोबतीने चालत राहावे हे उत्तम.

## ३२-दिल्याने होत आहे रे

● केल्यानं होत आहे रे. श्रीसमर्थ रामदासांनी दिलेला हा मोलाचा मंत्र. काय होईल, कसं होईल असं म्हणून निराशेने हातपाय गाळून स्वस्थ बसू नका. प्रयत्न करा. हळूहळू सगळं काही ठीक होईल. समर्थांचा हा उपदेश मोलाचा आहे यात संशय नाही, पण आजचा जमाना रामदासांच्या जमान्यापेक्षा निराळा आहे. केल्यानं होत आहे रे. पण काय केल्याने ? समर्थांचे म्हणणे आम्ही वर सांगितले आहेच. आजचं उत्तर मात्र निराळं आहे, ते योग्य की अयोग्य हे निराळे आजच्या चालू जमान्यात काय आहे एवढेच आम्ही सांगतो आहोत. आज केल्यानं होत आहे रे पेक्षा दिल्याने होत आहे रे हे अधिक वास्तव आहे. आपलं काम यशस्वी होण्यास काही तरी द्यावे लागते. काय ते तुम्ही समजू शकाल. चालू युगाला अनेकांनी अनेक नावे ठेवली आहेत. काही भ्रष्टाचार युग म्हणतात. अशा युगात आपलं काम हमखास होण्यासाठी दिलं पाहिजे. थोडसं दिलं जरासं काम होईल. पुष्कळ दिलत मनाजोगं काम होईल. ज्यांची देण्याची ताकद भरपूर आहे ते आज मनात येईल ते करू शकतात वा घडवून आणू शकतात. बहुतेक कामकरी दाम करी काम या संहितेप्रमाणे वागतात. जसं दाम तसं काम. बाजारात नाही का आपण पहात ? पैसे देतो माल घेतो. द्या मग काय पाहिजे ते घ्या, खिशातील दिलं की हातातलं काम यशस्वी. देवघेव ही असायचीच. उजळ माथ्याने व मर्यादेत असली तर ती योग्यही आहे. द्या व घ्या हे व्यापारी तत्त्व आहे. अध्यात्मातही ते खरं आहे. फरक एवढाच की, ऐहिक व्यवहारात देण्याघेण्याचे प्रमाण सम नसते. पण अध्यात्मात देणं घेणं सम प्रमाणात असतं. जेवढं द्यावं तेवढं घ्यावं. सुखासाठी जीवनात त्याग करावा लागतो. जेवढं द्यावं तेवढं सुख द्यावे व जेवढे घ्यावे तेवढे दुःख पत्करावे. कुटुंबात एकमेकाना देण्याची, एकमेकासाठी त्याग करण्याची वृत्ती असली, तशी त्यांच्यात स्पर्धा असली तर त्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ति सुखी होईल. कीर्ति वा सन्मान मिळविण्यात स्पर्धा नसावी तर

ती त्यागात असावी. जे कुटुंबाबद्दल तेच समाज व राष्ट्राबद्दल. त्यागाशिवाय सुखी जीवन नाही की समाज वा राष्ट्र नाही. म्हणून म्हणतो की दिल्याने होत आहे रे.

## ३३–धरतीची लेकरे

● बागेत लहान मोठी झाडे होती. गुलाब, मोगरा, जाई, जुई, सूर्यफूल ही लहान तशीच सोनचाफा, हिरवाचाफा ही मोठी. सगळीच एकाच धरतीमातेची लेकरे, पण सगळी भावंडं सारखी नव्हती. मोगरा आपल्या भगिनी जाईजुई यांच्यापेक्षा आकाराने मोठा होता. त्याला मागणीही मोठी होती. जाई जुई गुणी खऱ्या पण अल्पजीवि. सोनचाफा व हिरवाचाफा हे एकाच जातीचे असूनही त्यांच्या वागण्यात फार तफावत होती. एकही बहिण गुलाबासारखी नव्हती. गुलाब आल्या गेल्याला काटे टोची तर जाई जुई शेवंती सर्वांपुढे मृदूपणे वागत. कोणीही एक दुसऱ्यासारखे नव्हते. गुणात व मानात. सूर्यफूल ताठ मानेने जगाकडे पाही तर जाई जुई लाजून माना खाली घालीत. काहीना चांगले आयुष्य तर काही क्षणाचे सोबती. गुलाबाच्या अभिमानाच्या पाकळ्या क्षणाक्षणाला गळून पडत, हे सगळे पाहून विचाराने विचारलं का? असं का? एकाच मातेची ही लेकर. मातेने सर्वांना सारखेच पोसलं. सगळयाना सारखीच माती व सारखेच खत, माळयाने सर्वांना सारखे पाणी दिले. निगाही सर्वांची सारखी राखली. मग ही भांवडे एकमेकापासून एवढी निराळी का? समजलं हा फरक पोषणाचा नसून शोषणाचा आहे. ज्याने त्याने आपल्या गुणानुसार पाहिजे ती द्रव्ये मातीतून शोषून घेतली. एकाच मातेची चार मुले चार तऱ्हेची निपजतात कारण जो तो आपल्या कर्मगुणानुसार जे असेल त्याला पोषक अशा गोष्टी मातीतून परिस्थितीतून ग्रहण करतो. म्हणून भेद. नाही तर एकाच अन्न पाण्यावर वाढलेले जीव, जीवावरून आठवण झाली. जीव, जीवात्मा, आत्मा ही निरनिराळया परिस्थितीत आपण दिलेली नावं. आपण जीव गेला असे म्हणतो. मेला असं म्हणत नाही. आत्मा गेला म्हणजे देह मेला. आत्मा गेला म्हणतो आपण. पण कुठे? जो आलाच नाही तो जाईल तरी कसा? मग आलं कोण अन् गेलं कोण? वासना, ईच्छा युक्त असा लिंग देह. त्याच्या वासना तृप्त होतील अशी माती-परिस्थिती मातापिता तो निवडतो व त्यात देहधारण करतो व आपल्या वासना तृप्तीला पोषक अशा गोष्टी तो त्या मातीतून शोषून घेतो. म्हणून माणसां-माणसात व त्यांच्या परिस्थितीत फरक.

## ३४–कुत्रा व त्याचे शेपूट

● कुत्र्याला शेपूट असते हे काही मी सांगायला पाहिजे असं नाही. तसं म्हटलं तर सर्व प्राण्यानाच शेपूट असते. माणसालाही कोण्या एकेकाळी शेपटी होवी

असं म्हणतात. खरं की खोटं हे एकेकाळचे, आज आपण कसं सांगणार ? माकड हा मानवाचा पूर्वज आहे असं एक शास्त्रज्ञ म्हणतो. पण आम्हाला अनुभववांती असं वाटतं की कुत्रा हा मानवाचा पूर्वज असावा, कुत्र्याचे शेपूट व मानवाचे मन यांची दोस्ती लक्षात घेतली तर आमचा केवळ आमचाच हा शोध कुणालाही पटेल थक्क करील, बघा की कसं आहे ते. वाङ्गमयात कुत्र्याच्या शेपटीला जेवढे स्थान मिळाले आहे तेवढे इतर कोणत्याही प्राण्याच्या शेपटीला मिळालेले नाही. ज्याबद्दल आपल्याला आपुलकी जवळीक वाटते त्याला आपण वाङ्गमयात म्हणजे अक्षरात चिरंजीव करतो. याची पुष्कळ उदाहरणे देता येतील. अगदी नित्य परिचयाचे नेहमी सकाळी वाचण्यात येणारे म्हणजे 'कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की—आपल्या बांधवाला चिरंजीव करण्याची ही आपली आवड लक्षात घ्या आणि वाङ्मय शोधा. नळीत घालून सरळ केली तरी कुत्र्याची शेपटी वाकडी ती वाकडीच, लांगुलचालन, कुत्र्याप्रमाणे भुंकणे, कुतरओढ, कुत्र्याप्रमाणे मागे मागे जाणे, कुत्राही नसणे, कुत्राही विचारणार नाही, कुत्रासुद्धा हाल खाणार नाही. आता आपला अनुभव हे वाक्प्रचार एकत्र केले तर तुम्हाला नाही का वाटत की, काही माणसं त्यांना कुत्र्याच्या शेपटीप्रमाणे कितीही सरळ केले तरी वाकडी ती वाकडीच ? काही धनसंपत्ती वा अधिकार पाहून लांगुलचालन नाही का करीत ? व गोरगरीब पाहून त्यांच्यावर भुंकत ? कोणी बोलावो वा न बोलावो कुत्र्याप्रमाणे मोठ्या लोकांच्या मागे मागे जाणारी माणसे कमी काय आहेत ? मी त्या सभेला गेलो पण कुत्राही तेथे नव्हता. तो स्वतःला खूप मोठं समजतो खरा पण गावात त्याला कुत्राही विचारीत नाही. धन्याने हूं केलं की पळला तुटून, अशा मनोवृत्तीची माणसं या जगात कमी का आढळतात? अशांचीच संख्या जास्त. कुत्रा व माणूस यांच्या मनोवृत्तीतील साम्य लक्षात घेतल्यास आम्ही जे म्हणतो की मानवाचा खरा पूर्वज कुत्रा आहे हे खोटं आहे काय ?

---

**श्रीसाईलीला आक्टोबर १९७७ अंकात वाचा–साईभक्तांचे रम्य श्रद्धा स्थान, नवा नागपाडा येथील श्रीताईचे साईबाबा-ले. श्री. रामचंद्र परब.**

---

.............

# वाचकांचा पत्रव्यवहार

संपादक 'श्रीसाईलीला' मासिक यांनाः—

सप्रेम नमस्कार वि. वि.

आम्हाला आपल्याकडून एप्रिल ७७ खास रामनवमी विशेषांकपासूनचे अंक नियमितपणे मिळत आहेत. याबद्दल आम्ही आपले मनःपूर्वक आभारी आहोत. सर्व अंक फारच रोचक वाटले. विशेषतः 'रामनवमी विशेषांक, खास श्रीदत्तअंक विशेषांक फारच आवडले. हे अंक अनेक दृष्टीनी श्रीसाईभक्ताना वैशिष्ट्यपूर्वक मार्गदर्शकच आहेत. तसेच संत आणि सत्पुरुषांची तसेच परमेश्वराच्या अवताराची ओळख मिळते.

आमच्या घरातील लहान-थोर सर्वच मण्डळीना 'श्रीसाईलीला' मासिक फारच आवडते. तसेच ते केव्हा एकदा प्रसिद्ध होऊन हातात पडते व केव्हा वाचून संपवतो, व दुसरा अंक केव्हा एकदाचा मिळतो याची उत्कंठा मनाला सारखी लागलेली असते. 'श्रीसाईलीला' चे वाचनाने मनाला उत्साह आनंद वाटतो.

खास श्रीदत्त अंक फारच आवडला. या अंकातील गाठीभेटी २१, श्री. सदानंदजी चेंदवणकर यांनी लिहिलेला लेख फारच आवडला. तसेच 'गुरु आणि संत' डॉ. के. भ. गव्हाणकर, मुंबई. डॉ. अनील जायस्वाल, नागपूर. तसेच 'श्रीगुरुगौरव' श्री. चकोर आजगांवकर, मुंबई. यांचे लेख फारच आवडले. 'श्रीगुरुगौरव या लेखात श्रीदत्त व श्रीसाईबाबांबद्दल एकच प्रचिती दाखविली आहे. तसेच इतरही लेख चांगले आहेत. धन्यवाद.

एकंदरीत हा खास दत्त अंक प्रसिद्ध करून साईभक्तांच्या भक्तीत उत्कृष्ट भर घालून, श्रीसाईबाबांच्या सेवेत भर पाडल्याबद्दल, धन्यवाद. आभारी.

तुजविण साई । मज कोण तारी ॥

आपला नम्र,

**श्री. सूर्यकान्त शांबा धारगळकर**
आसगांव, बारदेश गोवा.

# शिरडी–वृत्त--माहे--जुलै १९७७

या महिन्यात अधिक मास आल्यामुळे आजूबाजूच्या खेड्यातील भाविक लोकांची व बाहेरून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारानी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :–

**कीर्तन**:– १) श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली. २) ह. भ. प. विठ्ठल रा. शास्त्री जि. चित्तूर. ३) ह. भ. प. रामदास महाराज बुलढाणा. ४) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिर्डी.

**प्रवचन**:– १) ह. भ. प. तीर्थराज मा. संजय जि. बीड.

**भजन गायन, वादन**:– १) श्री भजन मंडळ, जबलपूर. २) श्री. दत्तोबा शं. घुमरे व भजन मंडळ, निफाड. ३) ह. भ. प. विजयबाबा धंतोली, नागपूर. ४) कु. उषा जयसिंगाणी. ५) श्री. वाय. वाय. शर्मा, हैद्राबाद. ६) श्री. शिवा फ्रेंड सर्कल भजन मंडळ, मुंबई–७८. ७) श्री. दयानंद रा. महाराज, कुलाबा. ८) श्रीसत्यसाई समिती भजन मंडळ, नं. ७०. ९) कु. मंजिरी भ. कर्वे, पुणे–३०. १०) श्री. सुब्रह्मण्यम् स्वामी, पुणे.

**माननीयांच्या भेटी**:–

१) मा. श्री. एस. जी. घोलप. राज्यमंत्री, लहान पाटबंधारे, मत्स्य, खार जमिनी. महाराष्ट्र मुंबई.

२) मा. श्री. सुळे, जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर.

३) मा श्री. बी. एन. आडारकर, चेअरमन, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई.

४) मा. श्री. एम्. एस्. दयाळ, मार्केटिंग मॅनेजर दि फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई.

५) मा. श्री. एकनाथराव निंबाळकर, राज्यमंत्री, मध्यम व मोठे पाटबंधारे महाराष्ट्र, मुंबई.

६) मा. श्री. मधुकरराव चौधरी, महसूलमंत्री, महाराष्ट्र.

७) संत श्री. प्रकाशानंदजी महाराज, सप्तश्रृंगी, वणी, जि. नाशिक.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# श्रीसाई सेवा धाम–पिळगाव, गोवा गुरुपौर्णिमा उत्सव

ता. १–७–७७ ते ३–७–७७ ह्या तीन दिवसात गुरुपौर्णिमेचा उत्सव भक्तांच्या अपार उत्साहाने धुमधडाक्यात पार पडला. दसऱ्याच्या सुमुहूर्तावर द्वारकामाई मंदिराचा पायाभरणीचा कार्यक्रम समस्त भक्त जनांच्या हजेरीत पार पडला होता व आता काम पूर्ण व्हायच्या तयारीत आहे.

यंदा ता. १–७–७७ शुक्रवार पहाटे ५ वाजता मंगल वाद्यांनी कार्याचा शुभारंभ झाला ५–१५ वाजता काकड आरती झाली, श्रीवसंतशास्त्री उर्फ आबा पणशीकर यांनी स्वतःच्या हस्ते संस्थेचे आद्य संस्थापक श्री. पांडुरंग गणू शिरोडकर यांच्याकडून श्रींच्या पादुका बसविण्यात आल्या. संस्थेमार्फत संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत नरसिंह चणेकर यांनी अभिषेकविधि पार पाडला. सकाळी १० वा. साईसत् चरित्राच्या पारायणाला प्रारंभ झाला. १२ वाजता आरती, नैवद्य व मंत्र पुष्पांजली वाहण्यात आली. संध्याकाळी ५ वाजता श्रींची पालखीतून गावात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीत भजनी मंडळींनी उत्साहाने भाग घेतला होता.

रात्रौ साईनाथ बालभजन मंडळाचा कार्यक्रम झाला. त्यात भाग घेणारे कलावंत गोमंतकातील उदयोन्मुख कलाकारच होते. त्यात भाग घेणारे कलाकार श्री. तुळशीदास वेंगुर्लेकर, विशांत पिळगावकर, मनोहर साळगावकर, वासु नार्वेकर, शंकर शिरोडकर, नरेन्द्र साळगावकर आदि कलाकारांनी विशेष कामगिरी पार पाडली. हार्मोनियमची साथ रघुनाथ पेडणेकर व तबल्याची साथ रघुनाथ साळगावकर यांनी केली.

शनिवार ता. २–७–७७ सकाळी ७–३० वाजता भक्तांकडून अभिषेक, १२ वाजता आरती, नैवद्य, मंत्र पुष्पांजलि, संध्याकाळी ५ वाजता आबा पणशीकरांचे प्रवचन, ७ वाजता धूप आरती. ८ ते १० पर्यंत ह. भ. प. मणेरकर बुवा यांचे सुश्राव्य किर्तन व रात्रौ भजन मंडळाचा कार्यक्रम झाला.

रविवार ता. ३–७–७७ पहाटे ५ वाजता काकड आरती. ७–३० वाजता भक्ताकडून अभिषेक. १२ वाजता आरती, नैवेद्य व मंत्र पुष्पांजली. ५ वाजता ह. भ. प. मणेरकर बुवा यांचे काल्याचे किर्तन. हार्मोनियमची साथ श्री. श्रीपाद पिळगांवकर व तबल्याची साथ तबलापटू श्री. वामन पिळगांवकर यांनी केली. कृष्णलीलेचा कार्यक्रम बहारदार झाला. पेंद्याची उत्कृष्ट भूमिका पांडुलेबुवा यांनी पार पाडली. स्त्री व पुरुषांनी फुगड्या घातल्या. साईबाबांचा जयजयकार करून गुलाल उधळण्यात आला. श्री. कालीदास पिळगावकर यांनी श्रींची सजावट आकर्षक केली. आबा पणशीकर यांनी कार्यक्रम व्यवस्थित रितीने पार पडावा यासाठी खूपच कष्ट घेतले. व प्रचारकार्य मोठ्या धूमधडाक्याने तडीस नेले, व साई सेवा धाम या संस्थेस प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.